सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २५३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जमिनीचा सौदा रद्द झाला असला तरी, दोषींना सोडणार नाही

### पार्थ पवार यांच्या प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीसांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नागपूर**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्यावर पुण्यातील एका जमीन खरेदी व्यवहार प्रकरणी आरोप होत आहेत. जमिनीचा सौदा रद्द झाला असला तरीही या प्रकरणतील दोषींना सोडणार तर नाहीच, त्यांच्यावर कायदेशीर कारवाईसुद्धा सुरू राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते काल शुक्रवारी (७ नोव्हेंबर) रात्री नागपूर येथे बोलत होते.

मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, माझ्याकडे उपलब्ध माहितीनुसार, दोन्ही पार्टीमध्ये करार झाला होता. त्यात पैशांची देवाणघेवाण बाकी होती, परंतु



रजिस्ट्री मात्र पूर्ण झाली होती. आता दोन्ही पक्षांनी संयुक्तपणे रजिस्ट्री रद्द करण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगानं त्यांना शासनाच्या संबंधित विभागाकडून देय असलेले शुल्क भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आलेली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रजिस्ट्री रद्द करण्याची पुढची कार्यवाही निश्चितच होईल.

तथापि, हे सर्व झाल्यानंतरही सध्या दाखल असलेली फौजदारी गुन्ह्याची तक्रार (क्रिमिनल केस) आपोआप संपणार नाही. ज्या अनियमिततेच्या आधारे ही केस दाखल झाली आहे, त्याला जबाबदार असलेल्या व्यक्तींवर पुढील कायदेशीर कारवाई होत राहील.

याशिवाय, एक स्वतंत्र समांतर चौकशीही सुरू आहे. त्या चौकशीअंतर्गत सर्व बाबींची सखोल तपासणी करून एका महिन्याच्या आत अहवाल सादर केला जाईल. या अहवालातून या प्रकरणाची व्याप्ती किती आहे, यात आणखी कोण-कोण सहभागी आहेत, यासंबंधीची पूर्ण माहिती मिळेल आणि त्यानुसार पुढील योग्य कारवाई करण्यात येईल.

**कोणाचीही पाठराखण केलेली नाही**

काही लोकांना एफआयआर म्हणजे काय हे माहीत नसल्यामुळे ते असे आक्षेपार्ह आरोप करतात. एफआयआर दाखल करताना फक्त त्या व्यक्ती किंवा संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधींवर गुन्हा नोंदवला जातो, ज्यांनी प्रत्यक्ष व्यवहार केला किंवा कागदपत्रांवर स्वाक्षरी केली आहे. या प्रकरणातही कंपनीच्या अधिकृत सिग्नेटरींवरच एफआयआर दाखल झाला आहे.

मात्र, हे लक्षात घेणं महत्त्वाचे आहे की, चौकशी सुरू असताना जर आणखी कोणाचं नाव समोर आलं किंवा कोणाचा सहभाग आढळला, तर त्यांच्यावरही तत्काळ कारवाई केली जाते. सध्या दाखल झालेल्या एफआयआरमध्ये कोणालाही जाणीवपूर्वक डावलण्यात आलेलं नाही किंवा कोणाची पाठराखण केलेली नाही.

## सिंहस्थ कुंभमेळ्याबाबतच्या वक्तव्यावरून मंत्री नितेश राणे अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात केवळ हिंदूंचीच दुकाने लागावीत आणि इतर धर्मीयांना जागा देऊ नये, असे वादग्रस्त विधान करणारे राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांना महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडून लवकरच नोटीस बजावली जाणार आहे. राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी हा दावा करीत, राणेंच्या वक्तव्यामुळे राज्यातील सामाजिक सलोखा बिघडत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

प्यारे खान यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं की, नितेश राणे सतत वादग्रस्त वक्तव्य करून महाराष्ट्राला बरबाद करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देशाला व राज्याला एकतेचा संदेश देत असताना राणे वातावरण कलुषित करीत आहेत. हिंदू-मुस्लिमांमध्ये एकोपा राहावा यासाठी दोन्ही नेते प्रयत्नशील आहेत, पण राणे यांच्या विधानामुळे तेढ निर्माण होत आहे.

ते पुढे म्हणाले, या प्रकरणी मी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहे. मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी अनेक वादग्रस्त नेत्यांना बाजूला केलं आहे. त्याच यादीत नितेश राणेंचं नाव लवकरच दिसेल. अल्पसंख्याक आयोगाकडून



त्यांना नोटीस पाठवली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. नाशिक दौऱ्यावर असताना मंत्री नितेश राणे यांनी कुंभमेळ्यातील दुकानांसंदर्भात मोठं वक्तव्य केलं होतं. ते म्हणाले होते की, कुंभमेळा हा हिंदू धर्मीयांचा उत्सव आहे. त्यामुळे सर्वत्र केवळ हिंदूंचीच दुकानं लागली पाहिजेत. गोल टोपी आणि दाढीवाले येथे कशाला हवेत? दुकानाबाहेर नावं बदलून आत भलतीच व्यक्ती बसलेली असता कामा नये. त्र्यंबकेश्वर परिसरात इतर धर्मीयांची दुकानं दिसतात, त्यांचं तिथं काय काम? आम्ही त्यांच्या प्रार्थनास्थळाजवळ विकायला जातो का? असं विधान करीत त्यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, हिंदू समाज, साधू-संतांनी सतर्क राहावं, असे आवाहन केलं. नितेश राणेंच्या याच वक्तव्यावर राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी आक्षेप नोंदवला आहे.

## भारतरत्न लालकृष्ण अडवाणी यांचं ९८व्या वर्षात पदार्पण


### पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि इतर मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नवी दिल्ली**

भाजपाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवणी यांनी आज शनिवारी (८ नोव्हेंबर) ९८व्या वर्षात पदार्पण केलं आहे. यानिमित्तानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आडवाणींना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पंतप्रधानांनी आडवाणींना दूरदृष्टी आणि सर्वगुण संपन्न नेता म्हटलं आणि सांगितलं की, त्यांचं संपूर्ण आयुष्य भारताच्या प्रगतीला अधिक बळकटी देण्यासाठी समर्पित राहिलं आहे. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि आरोग्यासाठी शुभेच्छाही दिल्या.

पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर लिहिलं की, लालकृष्ण अडवाणी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. महान दूरदृष्टी आणि बुद्धीमान राजकारणी, अडवाणीजींचं जीवन भारताच्या प्रगतीला बळकटी देण्यासाठी समर्पित आहे. त्यांनी नेहमीच निस्वार्थ कर्तव्य आणि दृढ तत्त्वांचं मूर्तिमंत रूप धारण केलं. त्यांच्या योगदानानं भारताच्या लोकशाही आणि सांस्कृतिक परिदृश्यावर अमिट छाप सोडली आहे. देव त्यांना चांगले आरोग्य आणि दीर्घायुष्य देवो.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही भारतरत्न लालकृष्ण आडवाणी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी एक्सवर लिहिलं, 'भाजपाचे संस्थापक सदस्य, माजी राष्ट्रीय



अध्यक्ष आणि कोट्यवधी कार्यकर्त्यांचे प्रेरणास्रोत, 'भारतरत्न' श्री लालकृष्ण आडवाणीजी यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. आडवाणीजींनी दाखवून दिलं आहे की, निःस्वार्थ भावनेनं संपूर्ण आयुष्य राष्ट्राला कसं समर्पित केलं जातं. संघटनेपासून ते सरकारपर्यंत, त्यांच्या प्रत्येक जबाबदाऱ्याचं एकच ध्येय राहिलं आहे ते म्हणजे, राष्ट्र प्रथम.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी पक्षाला गावखेड्यांपासून ते महानगरांपर्यंत पोहोचवलं आणि गृहमंत्री म्हणून देशाच्या सुरक्षेला अधिक बळकट केलं. श्रीरामजन्मभूमी आंदोलनातही त्यांनी अग्रणी भूमिका बजावली आणि रथयात्रा काढून संपूर्ण देशात जनजागरण केलं. ईश्वराकडे त्यांच्या दीर्घायु आणि आरोग्यपूर्ण आयुष्याची प्रार्थना करतो.

## पार्थ पवारांचे प्रकरण एक गंभीर विषय : कुटुंब व राजकारण वेगवेगळ्या गोष्टी, सरकारने चौकशी करून वास्तव समाजापुढे ठेवावे - शरद पवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८पुणे**

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमीन खरेदी प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार अडचणीत सापडले आहेत. त्यांच्या अमेडिया एलएलपी कंपनीचे भागीदार असलेल्या दिग्विजय पाटील यांच्यासह आठ जणांवर याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. तब्बल दोन दिवसांनी शरद पवार यांची याप्रकरणी प्रतिक्रिया समोर आली आहे. अकोल्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी त्यांना पार्थ पवार यांच्याबद्दल विविध प्रश्न विचारण्यात आले.

पार्थ पवार प्रकरणात राज्य सरकार त्यांना वाचवत आहे का? असा प्रश्न यावेळी पत्रकार परिषदेत विचारण्यात आला होता. यावर शरद पवार म्हणाले की, राज्य सरकारने यावर चौकशी समिती स्थापन केली आहे. त्यामुळे या समितीच्या अहवालातून कोणत्या बाबी समोर येतात, ते पाहिले पाहिजे.

**मुख्यमंत्रीच म्हणतात हा गंभीर विषय..**

तसेच यानिमित्ताने अजित पवार यांना घेरण्याचा प्रयत्न झाला आहे का? असाही प्रश्न यावेळी विचारण्यात आला. त्यावर शरद पवार म्हणाले की, याबद्दल मला काही सांगता येणार नाही. पण हा गंभीर विषय असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. जर



मुख्यमंत्रीच हा गंभीर विषय असल्याचे सांगत असतील तर त्यासंबंधी चौकशी करून त्याचे वास्तव चित्र समाजासमोर ठेवले पाहिजे.

जमीन खरेदी प्रकरणात गुन्हा दाखल झालेले दिग्विजय पाटील आणि शीतल तेजवानी कोण आहेत?

पार्थ पवार प्रकरणात खासदार सुप्रिया सुळे यांनी सौम्य भूमिका घेत त्यांची पाठराखण केली होती. याहीबाबत शरद पवारांना प्रश्न विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, त्यांचे (सुप्रिया सुळे) असे मत असू शकते.

**पार्थ पवारांवर गुन्हा का नाही?**

अमेडिया एलएलपी कंपनीमध्ये पार्थ पवार यांची ९९ टक्के भागीदारी आहे. तर त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील यांची एक टक्के भागीदारी आहे, असे आरोप विरोधकांनी केले. तरीही पार्थ पवार यांना वगळून दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावर बोलताना शरद पवार म्हणाले, याचे उत्तर राज्याचे गृहमंत्री देऊ शकतात. तुम्ही आम्ही यावर उत्तर देऊ शकत नाहीत.

**कुटुंब नाही तर विचारधारा महत्त्वाची**

कुटुंब प्रमुख म्हणून या प्रकरणाकडे तुम्ही कसे पाहता? असे विचारले असता शरद पवार म्हणाले, प्रशासन, राजकारण आणि कुटुंब याच्यात फरक आहे. कुटुंबप्रमुख म्हणून मला विचाराल तर आम्ही एकमेकांच्या विरोधात निवडणुका लढलो. माझा एक नातू हा अजित पवारांच्या विरोधात उभा होता. अजित पवारांच्या पत्नी माझ्या मुलीच्या विरोधात उभ्या होत्या. राजकारणात आम्ही कुटुंब आणत नाही तर आमची विचारधारा आणतो.

## मनोज जरांगे पाटील यांना थेट मुंबई पोलिसांची नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

मराठा आरक्षणासाठी आंदोलन उभारणारे मनोज जरांगे पाटलांची अडचण वाढली आहे. मनोज जरांगे पाटील आणि विरेंद्र पवार यांना मुंबईतील आझाद नगर पोलीसांनी नोटीस जारी केली आहे. मार्च महिन्यात दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासासाठी ही नोटीस पाठवण्यात आली आहे. या नोटीशीत जरांगे पाटलांना १० तारखेला चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



मार्च-एप्रिलमध्ये मनोज जरांगे पाटील, विरेंद्र पवार आणि आणखी काही सहकाऱ्यांवर मुंबईच्या आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत. यात तपासाच्या अनुशंगाने चौकशी करण्यासाठी मनोज जरांगे पाटील आणि सहकाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटीशीत त्यांना १० तारखेला चौकशीसाठी हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मनोज जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे हे एकमेकांवर आरोप करताना दिसत आहेत. अशातच मनोज जरांगे पाटील यांनी काल नार्को टेस्ट करण्यासाठी आपण तयार आहे आणि पहिला अर्ज मीच करणार असं सांगितलं होते. आज त्यांनी अर्ज लिहिलेला आहे आणि त्यांचे सहकारी पांडुरंग तारख हे सदरील अर्ज घेऊन जालन्याच्या दिशेने रवाना झालेले आहे. पोलीस अधीक्षकांना हा अर्ज सुपूर्द करण्यात येणार आहे त्यावर त्यांनी मुख्यमंत्र्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री, ग्रह विभाग न्याय व विधी विभाग यांचा उल्लेख केलेला आहे असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## शिक्षक व पदवीधर मतदार संघांच्या निवडणुकांसाठी मतदार नोंदणी सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागातील पदवीधर मतदार संघ, तसेच पुणे व अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघांच्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पात्र पदवीधर आणि शिक्षकांकडून अनुक्रमे प्रपत्र १८ व १९ मध्ये प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी पात्रता-अपात्रतेचा निर्णय घेतील. त्यानुसार २५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील.यानंतर २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीत नागरिकांना या यादीविषयी दावे व हरकती सादर करण्याची संधी मिळेल. तसेच, ६ नोव्हेंबरनंतरही पदवीधर आणि शिक्षकांना प्रपत्र १८ व १९ द्वारे मतदार नोंदणी करण्याची मुभा असेल.

१० डिसेंबर २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांवर विचार करून ३० डिसेंबर २०२५ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.शिक्षक आणि पदवीधर मतदार संघांसाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा देखील उपलब्ध आहे. इच्छुकांनी https://mahaelection.gov.in/Citizen/Login या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.मतदार नोंदणीसाठी आवश्यक पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे व संबंधित माहिती या संकेतस्थळावरील चरपीरिश्र या विभागात पाहता येईल. त्यामुळे अद्याप अर्ज सादर न केलेल्या पात्र पदवीधर व शिक्षकांनी तात्काळ आपली नोंदणी करून घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एका प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## राज्यातील सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढा : हर्षवर्धन सपकाळांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात; हिवाळी अधिवेशनात चर्चेची मागणी


**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

भाजप महायुतीचे सरकार गेंड्याचे कातडीचे असून या सरकारचा कारभार पाहता त्यांनी बेशरमपणाचा कळस गाठला आहे. दररोज एक मोठे प्रकरण उघड होत असून कारवाई मात्र शून्य आहे. सत्ताधारी पक्षातील लोकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी राज्य लुटण्याचा सपाटा लावला आहे. मुंबई, पुणेसह राज्यात कोट्यवधी रुपयांचे भूखंड कवडीमोल भावाने लाटले जात आहेत. या सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढा आणि येत्या हिवाळी अधिवेशनात त्यावर एक संपूर्ण दिवसभर चर्चा करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.



टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप महायुती सरकारचा खरपूस समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांनी पुण्यातील ४० एकर महार वतनाची जमीन ३०० कोटी रुपयांना खरेदी केली, त्यासाठी केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क रुपये भरले, त्या जागेवर आयटी पार्क उभारण्याचा प्रस्तावही तातडीने मान्य करण्यात आला, दस्तावेजामध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार करण्यात आले. हा भ्रष्ट कारभार उघड झाल्यानंतर आता जमीन खरेदी व्यवहार रद्द केला असे सांगितले जात आहे, म्हणजे चोरी केल्याची कबुली देत आहेत, मग कारवाई का करत नाहीत? एफआयआर मध्ये पार्थ पवारांचे नाव का नाही? पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने याआधी पुण्याच्या बोपोडीतील ग्रीकल्चर डेअरीची सरकारी जमिन बोगस कागदपत्रे तयार करून हडपली. या सर्व व्यवहारासाठी पैसे कुठून आले तर ते एका साखर कारखान्यातून आले. हे पैसे कोणी दिले? कसे दिले? या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत. चौकशी समिती नेमून सरकार फक्त वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

भाजपचे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात जैन बोर्डिंगची जमीन लाटली होती, तो प्रकार उघड होताच व्यवहार रद्द करण्यात आला हे जाहीर करण्यात आले पण हे प्रकरण संपलेले नाही. या प्रकरणातील धर्मादाय आयुक्त हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नातेवाईक आहेत, त्यांच्यावर काय कारवाई झाली? मुंबईत अदानीला शेकडो एकर जमीन फुकटात दिली. भाजपच्या मुंबईतील कार्यालयासाठी सरकारी जमिनीचा केलेला व्यवहार, देवेंद्र फडणवीस यांनी उभा केलेला नवा शेठ मोहित कंभोजला एसआरएच्या जमिनी दिल्या आहेत. पुण्यात रिंगरोडच्या जमीन अधिग्रहणात मोठा घोटाळा करण्यात आला. समृद्धी महामार्गात कोणाची समृद्धी झाली हेही जनतेला कळाले पाहिजे, यासाठी सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढली पाहिजे, असे सपकाळ म्हणाले.



## संपादकीय ......

# उभा तर राहणारच!

काय मित्रा, एवढी कसली तयारी चालली आहे? नगरपरिषदेला वार्डातून उभा राहतोस की काय?अरे म्हणजे काय? उभा राहणारच आहे. गेल्या तीन निवडणुकांमध्ये उभा राहिलो तिन्ही वेळेला पडलो; पण धीर सोडला नाही, हिंमत खचली नाही. एक बार फिर लढेंगे.

ते ठीक आहे; पण कोणत्या पक्षाकडून उभा राहणार आहेस, याचा काही विचार झालाय का? अरे तसे काही आता राहिले नाही. आता जो पक्ष तिकीट देईल, त्याच्याकडून उभे राहायचे. नाहीच कुणी दिले तर आपण अपक्ष आहोतच की. पक्षाचा फायदा एवढाच होतो की, निवडणूक चिन्ह लोकांच्या ओळखीचे असते आणि ते लोकांपर्यंत पोहोचवणे सोपे जाते. बाकी काय, निवडणुका कशा जिंकायच्या, हे तुला माहितीच आहे. नाही रे, मला फारशी माहिती नाही. जे काय वर्तमानपत्रातून, बातम्यातून असते तेवढीच मला माहिती आहे. मागच्या निवडणुकीला तू पडलास तेव्हा नेमके काय झाले होते? अरे बाबा, काय कथा सांगायची? माझ्या घरामध्ये एकूण २० मते आहेत आणि त्यातली मला फक्त बारा मते पडली. माझ्या आई-वडिलांनीसुद्धा मला मतदान केले नाही.

अरे अजिबात नाही. माझ्या वडिलांना नेहमी वाटते की, मी जर नगरसेवक म्हणून निवडून आलो तर पाच वर्षांत एवढा बिघडून जाईन की पुन्हा सुधारणे शक्य होणार नाही. त्यांनी आयुष्यामध्ये एकही चांगला नगरसेवक पाहिलेला नाही. त्यामुळे त्यांनी मला मतदान केले नाही. घरातल्या लोकांनीच मतदान केले नाही, तर ज्या लोकांची मी पाच वर्षे कामे केली त्यांनीही मतदान केले नाही. मग मी निवडून कसा येणार सांग. शिवाय मला चिन्ह मिळाले ते कपबशी. मी घरोघर प्रत्येकी एक डझन कपबश्या वाटल्या. लोक आजही त्यातून चहा पितात; परंतु त्यांनी मला मतदान केले नाही, हे मात्र निश्चित आहे.नशीब तुझे तुला टीव्ही चिन्ह मिळाले नाही. नाहीतर घरोघरी टीव्ही वाटायला लागले असते आणि पैशाची वाट लागली असती. पैशाची तर वाट अशीही लागलीच आहे. मागच्या इलेक्शनच्या वेळेला पाच एकरचा तुकडा विकला होता. या इलेक्शनला तीन एकरचा तुकडा काढला आहे विकायला. सगळी जमीन गेली तरी चालेल; पण निवडणुकीला उभा राहणार म्हणजे राहणारच!

# प्रभागरचना, आरक्षणावरील निकालांच्या अधीन असेल स्थानिक संस्था निवडणूक- उच्च न्यायालय

## राज्य निवडणूक आयोगाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई:**
प्रभाग सीमांकन, आरक्षण रोटेशन, नव्या कायद्यातील काही तरतुदींची वैधता अशा मुद्द्यांवर दाखल याचिकांवरील निकालाच्या अधीन महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका असतील, असे उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले.

मुख्य न्या. श्री चंद्रशेखर व न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने राज्य सरकार व राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावित २४ नोव्हेंबर रोजी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत याचिकांवर अंतिम सुनावणी २७ नोव्हेंबर रोजी ठेवली. राज्यातील पालिकांचे प्रभाग सीमांकन आणि आरक्षण रोटेशनसंदर्भात उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल केल्या आहेत. या सर्व याचिकांवर शुक्रवारी सुनावणी झाली.ठाणे महापालिकेच्या प्रभाग सीमांकनाला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांच्यावतीने ज्येष्ठ



वकील अनिल अंतुरकर यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, सर्वोच्च न्यायालयाने ४ मे २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार, प्रभाग सीमांकन अधिकार स्वत:कडे ठेवण्याबाबत राज्य सरकारचा नवा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने केलेले प्रभाग सीमांकन गृहीत धरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे सरकार व निवडणूक आयोगाला बंधनकारक आहे.

काय म्हणाले न्यायालय?

जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रभागांमध्ये दिलेल्या रोटेशनपद्धतीत त्रुटी असल्याने यासंदर्भातील कायद्यातील तरतुदींना न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे न्यायालयाने राज्य निवडणूक आयोग व राज्य सरकारला बाजू मांडण्याची संधी मिळावी, याकरिता नोटीस बजावली. महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुका या याचिकांच्या अंतिम निकालाच्या अधीन असतील, असे न्यायालयाने यावेळी स्पष्ट करत पुढील सुनावणी २७ नोव्हेंबर रोजी ठेवली.

# वेल वर्गीय भाजीपाला पिकांतील सद्यस्थितीतील कीड नियंत्रण कसे करावे?

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**
वेलवर्गीय भाजीपाला फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. नियंत्रणासाठी फुले येण्याच्या काळात 'क्यू ल्यूर' कामगंध सापळे एकरी ५ या प्रमाणात मंडपात लावावेत. फळांची काढणी योग्य पक्वतेस करावी. प्रादुर्भावग्रस्त फळांमधून फळमाशीची उत्पत्ती वाढत

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

असल्याने अशी फळे गोळा करून नष्ट करावीत. वेलांखालील माती




वेळोवेळी हलवून घ्यावी.कारली, पडवळ, दुधी भोपळा, दोडका या पिकांवर तांबडे भुंगेरे, मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो. यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा झाडीरॅक्टीन (३०० पीपीएम) ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

**रोग नियंत्रण-** काळा करपा, केवडा (डाऊनी मिल्ड्यू) रोगांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, नियंत्रणासाठी अमिटोक्ट्रॅडीन (२७%) + डायमिथोमॉर्फ (२०.२७% एससी) २ मिली किंवा बेनालॅक्सिल (४%) + मॅन्कोझेब (६५% डब्लूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

आवश्यकतेनुसार पुढील फवारणी १० दिवसांच्या अंतराने करावी. भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, नियंत्रणासाठी हेक्झाकोनॅझोल १ मि.ली. किंवा मेप्टिलडीनोकॅप ०.७ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारावे.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय सेवा केंद्र, इगतपुरी




## खजुराच्या बिया आहेत एनर्जी बूस्टर जाणून घ्या सेवन करण्याची पद्धत

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**
खजूर खाल्लयानंतर त्याच्या बिया निरूपयोगी समजून फेकून देत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. साधारणपणे खजूर खाल्लयाने होणारे फायदे सर्वांना माहिती आहेत. पण खजूर खाल्लयानंतर जी बी तुम्ही फेकून देता ती सुद्धा उपयुक्त आहे. बहुगुणी खजुराच्या बिया शरीराच्या अनेक समस्या दूर करू शकतात. आज आपण जाणून घेऊयात खजुराच्या बिया कोणत्या आजारावर उपयुक्त आहेत आणि त्या सेवन करण्याची पद्धत.



खजुराच्या बियांची पावडर पाण्यात किंवा दुधात घालून प्यायल्याने अनेक फायदे होतात. या बियांमध्ये खराब कोलेस्ट्रॉल आणि उच्च रक्तातील साखर नियंत्रित करण्याचा गुणधर्म आहे.

खजुराच्या बियांमध्ये भरपूर फायबर असते. जे पचन संस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. याचे पावडर स्वरूपात सेवन केल्याने बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर खजुराच्या बियांची पावडर उपयुक्त ठरेल. या बिया कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवतात. ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

रोगप्रतिकारकशक्ती कमी असेल तर खजुराच्या बियांचे सेवन करावे. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते.

खजुराच्या बियांची पावडर स्क्रब म्हणून वापरावी. यामुळे डेड स्किन निघून जाईल आणि त्वचा चमकदार बनते.

केसांच्या विविध समस्या असतील तर खजुराच्या बिया उपयुक्त ठरतील. खजुराच्या बियांचे तेल केस मजबूत करण्यासाठी हे वापरता येईल.

कशी बनवाल पावडर?

खजुराच्या बिया चांगल्या प्रकारे धुवून त्या उन्हात वाळवाव्यात.

कोरड्या झाल्यानंतर त्यांना हलके भाजून घ्यावे.

भाजल्याने बियांमधील ओलावा पूर्णपणे निघून जाईल.

थंड झाल्यावर या बिया मिक्सरमध्ये बारीक करून त्याची पावडर बनवावी.

# रविभवनातील बंगल्यांचा वापर वर्षभर, दुरूस्ती आवश्यकतेनुसारः अधीक्षक अभियंता भानुसे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर :** रविभवन येथील बंगल्यांची देखभाल, दुरुस्ती व रंगरंगोटीवर कोट्यवधींचा खर्च करण्यात येत असल्याचे आरोप होत आहे. परंतु रविभवनातील बंगलयांचा वापर हा केवळ अधिवेशन काळापूरता मर्यादित नाही. तर वर्षभरत्यांचा वापर होतो. त्यामुळे येथील बंगल्यांची दुरूस्ती ही आवश्यकतेनुसारच होत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागातील नागपूर विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे यांनी शुक्रवारी सांगितले. काही बंगल्यांच्या दुरुस्तीसाठी संबंधित मंत्र्यांचे पत्र असल्याची बाबही त्यांनी यावेळी मान्य केली.

रविभवन येथील बंगल्यावर कोट्यवधींचा खर्च होत असून या खर्चाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. तसेच त्यांनी आवश्यकोनुसारच दुरूस्तीची कामे करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर शुक्रवारी अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे आणि कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत राऊलकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, रविभवनातील बंगले जुने ७५ वर्षे आहेत. सर्वच बंगले एकाच वेळी खराब होत नाही.

दरवर्षी काही बंगल्यांची मेजर दुरुस्ती करावी लागते. यंदा ९, १८ व २९ क्रमांच्या या तीन बंगल्याचे संपूर्ण छत व टाईल्स बदलवण्याची गरज होती. त्यानुसार ते काम केले जात आहे. इतर बंगल्याचीही आवश्यकतेनुसारच दुरूस्ती केली जात आहे. काही बंगल्यासाठी मंत्र्यांचे पत्र आले आहे. बंगल्यात करावच्या कामासाठी त्यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यात. त्यानुसार काम करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दरवर्षी अधिवेशनानिमित्त कामे करण्यात




येते. परंतु बंगल्याचा वापर हा वर्षभर होतो. त्यामुळे ही कामे आवश्यकत असतात. साधारणत: १२ ते १५ लाख रुपये एका बंगल्याच्या दुरुस्तीवर खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

**-राजभवनात किचन व दुरूस्तीचे मोठे काम**

राजभवन येथे यंदा १० कोटींचे कामे प्रस्तावित करण्यात आले आहे. राजभवन परिसर अतिशय विस्तीर्ण आहे. अनेक खोल्या तेथे आहेत. तेथील मुख्य इमारतीमध्ये दुरूस्ती आणि किचनचे काम आहे. यासोबतच तेथे पाच बंगले आहेत. त्याचीही कामे असून टॉयलेटचेही काम असल्याचे भानुसे यांनी सांगितले.

**- ९ कॅबिनेट मंत्र्यांची व्यवस्था नागभवनात**

रविभवन येथे तीस बंगले आहेत. यापैकी ६ बंगले हे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती आणि दोन विरोधी पक्ष नेते यांच्यासाठी राखीव असते. मंत्रिमंडळात ३३ कॅबिनेट मंत्री आहेत. २४ मंत्र्यांची व्यवस्था रविभवनात होईल. त्यामुळे ९ कॅबिनेट मंत्र्यांच्या राहण्याची व्यवस्था ही राज्यमंत्र्यासाठी असलेल्या नागभवन येथे करण्यात येणार असल्याचे भानुसे यांनी यावेळी सांगितले.

# बच्चू कडू अभ्यास करून बोला, हायकोर्टाने सुनावले

## आंदोलकांना हटवण्याचा आदेशावरून केलेली टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर-** नागपूर-वर्धा रोडवरून शेतकरी आंदोलकांना हटविण्याचा आदेश दिल्यामुळे हायकोर्ट शेतकरीविरोधी आहे, अशी बोचरी टीका करणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यावर वरिष्ठ न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी गुरुवारी कडक ताशेरे ओढले. कडू यांनी हायकोर्टावर निराधार व मनमानी आरोप करू नये. त्यांनी असे आरोप करण्यापूर्वी हायकोर्टाविषयी सखोल अभ्यास करावा, असे न्या. किलोर म्हणाले. गेल्या २८ व




२९ ऑक्टोबर रोजी कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी नागपूर-वर्धा रोड बंद करून हजारो निरपराध नागरिकांना वेठीस धरले होते. या असंवैधानिक आंदोलनामुळे हा रोड सुमारे ३५ तास बंद होता. परिणामी, रुग्ण, लहान मुले व महिलांचे हाल-बेहाल झाले. व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. आंदोलकांनी स्वत:च्या अधिकारांसाठी लढताना इतर नागरिकांच्यामूलभूत अधिकारांची तमा बाळगली नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यासंदर्भात स्वत:च जनहित याचिका दाखल करून शेतकरी आंदोलकांना नागपूर-वर्धा रोडवरून हटविण्याचे व रोड वाहतुकीसाठी मोकळा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सरकारनेही शेतकरी कर्जमाफीसाठी सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे कडू यांनी रोड रिकामा केला.

# डॉ. नंदकिशोर राऊत अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नवे डीन

## वर्षभरातच डॉ. किशोर इंगोले यांच्याकडील अतिरिक्त कार्यभार संपुष्टात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**
वर्षभरापासून अमरावती शासकीय वैद्यकीयमहाविद्यालया चा अतिरिक्त अधिष्ठाता (डीन) पदावर कार्यरत असलेले डॉ. किशोर इंगोले यांचा कार्यभार संपुष्टात आला आहे.

त्यांच्या जागी आता डॉ. नंदकिशोर राऊत हे अमरावतीचे नवे अधिष्ठाता राहणार आहेत. नागपूर शासकीय वैद्यकीयमहाविद्यालयात कार्यरत असलेल्या डॉ. राऊत यांची पदोन्नतीने अधिष्ठातापदी निवड झाली आहे. यासंदर्भात ४ नोव्हेंबरला वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने या शासन निर्णय जारी केला आहे.

जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर १ ऑगस्ट २०२३ रोजी डॉ. अनिल बत्रा यांच्याकडे महाविद्यालयाच्या अतिरिक्त अधिष्ठाता पदाचा कार्यभार देण्यात आला होता. डॉ. बत्रा यांनी कार्यभार स्वीकारताच महाविद्यालयाला 'एनएमसी'ची मंजुरी मिळविण्यासाठी आवश्यक सर्व प्रक्रिया राबविली होती. त्यानंतर शासनाने ५ सप्टेंबर रोजी डॉ. बत्रा यांचा कार्यभार संपुष्टात आणून त्यांच्या जागी डॉ. किशोर इंगोले यांच्याकडे अतिरिक्त अधिष्ठाता पदाची जबाबदारी स्वीकारली. डॉ. किशोर इंगोले यांच्या कार्यकाळातच महाविद्यालयातील 'एमबीबीएस'चे पहिले शैक्षणिक वर्ष सुरू झाले. अशातच महाविद्यालय यंदाच्या दुसऱ्या वर्षात पदार्पण करत असताना, नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे नेत्ररोग विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले डॉ. नंदकिशोर राऊत यांची पदोन्नतीने अमरावती शासकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातापदी नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसांत ते आपला कार्यभार स्वीकारणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**वैद्यकीय महाविद्यालयाचीही कामे बाकी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे दुसरे वर्ष सुरू होत असल्याने नव्याने रुजू होणारे डॉ. नंदकिशोर राऊत यांची जबाबदारी देखील वाढणार आहे. त्यांना प्रामुख्याने जिल्हा रुग्णालय महाविद्यालय प्रशासनाच्या ताब्यात घ्यावे लागणार आहे. अजूनही सुरू न झालेल्या महाविद्यालयाच्या स्वत:च्या इमारतीच्या बांधकामाविषयी पाठपुरावा करावा लागणार आहे. तसेच नव्याने प्रवेशित होणाऱ्या मुलांच्या वसतिगृहाची सुविधा, महाविद्यालयाला आवश्यक मनुष्यबळ मिळविण्याची कामे करावी लागणार आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण


# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंख्येत चार हजारांवर घट; ६ नोव्हेंबरला संपली नोंदणी

## २५ ला प्रसिद्ध होईल प्रारूप मतदार यादी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघासाठी मतदार नोंदणीची मुदत गुरुवारी ६ नोव्हेंबरला संपली. यामध्ये विभागात ३१,५१३ मतदारांनी नोंदणी केलेली आहे. सन २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत ३५६२२ मतदार संख्या होती. त्या तुलनेत यावेळी ४१०९ ने मतदार संख्या सद्यस्थितीत घटली आहे. २५ नोव्हेंबर २०२५ ला प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल. मतदार नोंदणीची प्राथमिक मुदत संपली तरीदेखील शिक्षक मतदारांना पुढील काळात नावनोंदणी करता येईल मात्र ही नावे पुरवणी यादीत राहणार असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले. निवडणूक आयोगाने यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यात ऑफलाइन व ऑनलाइन मतदार नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

विशेष म्हणजे, यावेळी ११,४७९ अर्ज हे ६ नोव्हेंबर या अखेरच्या दिवशी प्राप्त झाले आहेत. यामध्ये फक्त ३ ऑनलाइन अर्ज बुलढाणा जिल्ह्यातील आहेत.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची प्रारूप यादी २५ नोव्हेंबरला प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर १० डिसेंबरपर्यंत आक्षेप व हरकती दाखल करता येतील. त्यानंतर अंतिम मतदार यादी ३० डिसेंबर २०२५ ला प्रसिद्ध दोणार आहे.

### २०२० व २०२५ मधील तुलनात्मक मतदारसंख्या

सन २०२० मधील निवडणुकीसाठी ३५,६२२ मतदारसंख्या होती. यामध्ये सर्वाधिक १०,३८६ मतदार अमरावती जिल्ह्यात होते. याव्यतिरिक्त अकोला ६,४८०, बुलढाणा ७,४८४, वाशिम ३,८१३ व यवतमाळ जिल्ह्यात ७,४५९ मतदार होते–



१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर ६ नोव्हेंबरच्या यादीत ३१,५१३ मतदार संख्या आहेत व यामध्ये सर्वाधिक ८,९१९ मतदार बुलढाणा जिल्ह्यात, याव्यतिरिक्त अमरावती ८,२००, अकोला ५,०४२, यवतमाळ, ६२४२ व वाशिम जिल्ह्यात ३,११० मतदान आहेत.

# बालविवाह रोखण्यासाठी लोकप्रतिनिधींची भूमिका महत्वाची

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती,** बालविवाह होत असल्यास गावातील नागरिकांन याची माहिती असते. त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी प्रामुख्याने मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका आणि लोकप्रतिनिधींनाची भूमिका महत्वाची असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज 'बालविवाह मुक्त महाराष्ट्र, आपला संकल्प अभियान'च्या अनुषंगाने बैठक पार पडली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, महिला व बालविकास उप मुख्य कार्यकारी अधिकारी विलास मसराळे, माविमचे जिल्हा समन्वयक डॉ. रंजन वानखडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी उमेश टेकाळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले, पोलिस विभागाच्या दिप्ती ब्राम्हणे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, जिल्हाधिकारी मुलामुलींचा जन्मदर हा समाधानकारक आहे. मात्र काही भागात बालविवाह होत आहे. त्यामुळे माता आणि बालकांचे चांगले पोषण होत नसल्याने मातामृत्यू आणि बालमृत्यूची स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळे कमी वयात होणारे विवाह रोखणे आवश्यक आहे. यासाठी प्रामुख्याने शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हाभरात किशोरी मेळाव्यांसारखे उपक्रम राबविण्यात यावे. मेळघाटात कोरकू बोलीभाषा असल्यामुळे जनजागृतीसाठी त्यांच्याच भाषेचा उपयोग करावा.

शाळेतून मुलींची अनुपस्थिती ही मुख्याध्यापकांना पहिल्यांदा जाणवते. त्यामुळे मुख्याध्यापकांनी अचानक शाळेत मुलींची गैरहजेरी जाणविल्यास याबाबत समितीला माहिती द्यावी. अशा मुलींचे बालविवाह होत असल्यास तातडीने याची माहिती देण्यात यावी. तसेच गावातील ग्रामसेवक, सरपंच यांनाही गावातील विवाहाची माहिती होत असल्याने त्यांच्यावरही जबाबदारी सोपविण्यात यावी. गावात बालविवाह झाल्यास ग्रामसेवकांवर कार्यवाही करावी. बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती ही महत्वाची असल्याने येत्या बालकदिनी बालविवाह रोखण्याची शपथ सर्व शाळांमध्ये घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिली.

बेटी बचाओ, बेटी पढाओ या अभियानाबाबत जनजागृती करण्यात यावी. यासाठी कृति आराखडा तयार करण्यात यावा. यात कार्यक्रमाचे नियोजन करून जिल्ह्यात राबविण्यात यावेत. तसेच गावातीलच महिलांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविले असल्यास अशांचा सत्कार करण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी उपस्थितांनी बालविवाह रोखण्याची शपथ घेतली.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्तांना दिले विजयाचे कान मंत्र

## भाजप मेळघाट विधानसभा पदाधिकारी मेळावा उत्साहात संपन्न नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकांसाठी मोर्चेबांधणीला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८धारणी–** आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी मेळघाट विधानसभा कार्यकर्ता पदाधिकारी मेळावा चिखलदरा येथे उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात मेळघाट जिल्हा अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, आमदार केवलराम काळे, जिल्हा महामंत्री सदाशिवराव खडके, जिल्हा उपाध्यक्ष अप्पा पाटील, श्याम गंगराडे, चिखलदरा तालुकाध्यक्ष दिनेश चव्हाण, वेदांत सुरपाटणे, धारणी शहर अध्यक्ष विवेक नवलाखे, धारणी – पूर्व अध्यक्ष गजानन सुडस्कार, – पश्चिम मंडल अध्यक्ष बंसी सेलुकर, यशवंत काळे आदी मान्यवर उपस्थित होते.



मेळाव्यात सुरुवातीला बाबासाहेब आंबेडकर, भगवान बिरसा मुंडा आणि संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून पूजन करण्यात आले.


पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, भाजपची चार चाकांची गाडी म्हणजे एक चाक देवेंद्र फडणवीस, दुसरे पालकमंत्री बावनकुळे, तिसरे आमदार काळे आणि चौथे चाक म्हणजे तुम्ही कार्यकर्ते सर्वांनी मिळून ही गाडी पुढे चालवायची, कारण प्रत्येक मत विजय ठरवते, असेही त्यांनी आवाहन केले. नगरपंचायत निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाचा नगराध्यक्ष बसवून दाखवू. तर आमदार केवलराम काळे यांनी म्हटले की, मेळघाटातील जनतेने मला अभूतपूर्व विजय दिला आहे; तसाच विजय या निवडणुकांमध्येही आम्ही मिळवून दाखवूया मेळाव्यात मेळघाट जिल्हा महामंत्री सुधीर रसे, भाजपा नेत्री दुर्गा ताई बिसंदरे, क्षमा चौकसे, जया खंडारे, अर्पण मालवीय, सुशील गुप्ता, महेश मालवीय, दिपक मालवीयतसेच रामकृष्ण सोनोने आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यकर्त्यांनी संकल्प घेतला की, आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेस–महाविकास आघाडीच्या उमेदवाराला एक ही नगरसेवकपद मिळू देणार नाही.भाजपच्या या मेळाव्याने मेळघाटात निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असून, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि विजयाचा संकल्प दिसून आला.

# सोमवारी ठरणार अमरावती शहराचा स्वच्छतेचा कंत्राटदार

## शर्यतीत आता तीन कंपन्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती –** घराघरातून कचरा गोळा करण्यासाठी आणि कंपोस्ट डेपोपर्यंत वाहून नेण्याच्या कंत्राटासाठी निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या चार कंपन्यांपैकी आर अँड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडला टेक्निकल बीडमधून अपात्र घोषित करण्यात आले. त्यामुळे आर अँड बी इन्फ्रा शर्यतीतून बाहेर पडली आहे. सोमवारी फायनान्शिअल बीड उघडण्यात येणार असल्याने शहराच्या स्वच्छता कंत्राटदार सोमवारी निश्चित होईल. गोपीनाथ रेड्डी (कर्नाटक), अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड (नागपूर) आणि कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (मुंबई). या कंपन्यांनी कंत्राट मिळविण्यासाठी सादर केलेल्या आर्थिक बोली सोमवारी (ता. १०) दुपारी ४ वाजता उघडल्या जातील. त्यानंतर, सर्वात कमी बोली सादर करणाऱ्या कंपनीला अंदाजे २४५ कोटी किमतीचा स्वच्छता कंत्राट देण्यात येईल.

महानगरपालिकेने महिन्यात शहरासाठी गेल्या स्वच्छता आणि कचरा विल्हेवाटीसाठी आणि संयुक्त कंत्राटांसाठी निविदा सूचना प्रकाशित केली होती. १४ ऑक्टोबरला झालेल्या निविदापूर्व



बैठकीत सात कपन्यानी भाग घेतला. २४ ऑक्टोबरला सात कंपन्यांपैकी चार कंपन्यांनी त्यांचे निविदा प्रस्ताव ऑनलाइन सादर केले. त्यानंतर, ४ नोव्हेंबर रोजी महानगरपालिकेत छाननी समितीची बैठक झाली. चारही बोली लावणाऱ्या कंपन्यांना त्यांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. निविदा प्रस्तावांच्या तांत्रिक बाबींवर चर्चा करण्यासाठी तांत्रिक बोली लिफाफे उघडण्यात आले. सर्व कंपन्यांनी सादर केलेले कागदपत्र अटी आणि शर्तींचे पालन करतात की नाही, याची पडताळणी करण्यात आली.

### पडताळणीनंतर आर अँड बी इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या

कंपनीला स्वच्छता करार प्रक्रियेत पुढे जाण्यास अपात्र घोषित करण्यात आले आणि त्यांना शर्यतीतून वगळण्यात आले. परिणामी, सध्या स्वच्छता करारासाठी स्पर्धा करणाऱ्या तीन कंपन्या म्हणजे पी. गोपीनाथ रेड्डी (कर्नाटक), अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड (नागपूर) आणि कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (मुंबई) आहे., तांत्रिक बोली आणि सादरीकरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या तीन कंपन्यांची आर्थिक बोली असलेले लिफाफे सोमवारी (ता. १०+ नोव्हेंबर) उघडले जातील. त्यानंतर, सर्वात कमी बोली किंमत असलेल्या कंपनीला, १० नोव्हेंबर रोजी अंदाजे २४५ कोटी किमतीचे स्वच्छता कंत्राट दिले जाईल., परिणामी, स्वच्छता कंत्राटाच्या शर्यतीत कोणती कंपनी 'एल१' घोषित करण्यात. येईल, याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे.

# आला थंडीचा महिना..! स्वेटर, कानटोप्या काढा!

## राज्यात १०, मुंबईचा पारा १६ अंशांपर्यंत घसरणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** ऑक्टोबर महिना पावसाच्या सरींत गेल्यानंतर आता नोव्हेंबर थंडी घेऊन येणार आहे. हिमालयातील हवामान बदलामुळे दक्षिण भारताकडे शीत वारे वाहू लागले असून, शनिवारपासून बुधवारपर्यंत मुंबईचे किमान तापमान १६ तर, राज्याचे १० अंश सेल्सिअसपर्यंत उतरण्याची शक्यता आहे. त्यामुळे दिवाळीनंतर का होईना हुडहुडी भरण्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. बंगालच्या उपसागरात आलेले मोंथा चक्रीवादळ आणि अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मुंबईसह राज्यभरात



अवकाळी पावसाने थैमान घातले. त्यामुळे नागरिकांना ऑक्टोबर हीटचे चटके बसले नाहीत. हा महिना सुखावह गेला असतानाच त्यात आणखी भर पडणार असून, नागरिकांना नोव्हेंबर महिन्यात थंडी अनुभवता येईल.

गुरुवारी जारी केलेल्या आयएमडीच्या विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात येत्या २ आठवड्यांत म्हणजे ७–२० नोव्हेंबरदरम्यान किमान आणि कमाल तापमान सामान्यापेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

# आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची शहरभर स्वच्छता पाहणी

## 'स्वच्छ अमरावती'साठी नागरिकांच्या सहभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–** शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने राबविल्या जात असलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेला गती देण्यासाठी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज सकाळी शहरातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आयुक्तांनी वेलकम पॉईंट, रहाटगाव रोड, नागपूर रोड तसेच विभागीय आयुक्त कार्यालय रोड परिसरातील स्वच्छतेची स्थिती तपासली. रस्ते, नाले, कचरापेट्या आणि सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करून संबंधित अधिकारी आणि स्वच्छता निरीक्षकांना आवश्यक सूचना दिल्या. शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नाही; प्रत्येक नागरिकानेही यात सक्रिय सहभाग घ्यायला हवा, असे सांगून आयुक्तांनी कचरा नियोजित ठिकाणी टाकणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि स्वच्छ परिसर राखण्याचे आवाहन केले. 'स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती' हे स्वप्न सामूहिक प्रयत्नांनीच साकार होऊ शकते, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी त्यांनी सफाई कामगारांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि आवश्यक ती उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि वसाहतींमध्ये कचरा संकलन, रस्ते धुणे, नाल्यांची सफाई, झाडांची छाटणी तसेच जनजागृती उपक्रम राबविण्यासाठी स्वच्छता विभागाने विशेष मोहीम सुरू केली आहे.



आयुक्त चांडक यांनी आवश्यक तेथे अतिरिक्त सफाई कर्मचार्यांची तात्काळ नियुक्ती करण्याचे निर्देश संबंधित विभाग प्रमुखांना दिले. स्वच्छता कामकाज नियमित व प्रभावीपणे पार पडावे यासाठी देखरेख वाढविण्यावरही त्यांनी भर दिला.

या पाहणीदरम्यान सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, जेष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू डिक्याव यांच्यासह स्वच्छता विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सुधारणा आवश्यक असलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन चर्चा करण्यात आली.नागरिकांकडून होत असलेल्या सकारात्मक प्रतिसादाचाही उल्लेख करत, स्वच्छता ही सेवा, जबाबदारी आणि आपल्या शहराच्या गौरवाशी निगडित आहे.

# एसटी महामंडळातील आगार व्यवस्थापक घ्यायचा मद्याचे घोट

## निलंबनाचे आदेश: कामात हलगर्जीपणा:

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८परतवाडा**

एसटी महामंडळातील परतवाडा येथील आगार व्यवस्थापक मद्यपान करून कामात कचुराई करायचा. त्याला प्रादेशिक व्यवस्थापकांनी निलंबित केले आहे. या प्रकरणाबाबत आपण जाणून घेऊ या.एसटी महामंडळात कर्तव्यावर असताना मद्यप्राशन करून कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल अमरावती विभागातील परतवाडा आगार व्यवस्थापक जीवन दत्तात्रय वानखेडे यांना एसटी महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापकांनी निलंबित केले आहे. याबरोबरच त्यांची विभागीय चौकशी करून त्यात ते दोषी आढळल्यास त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई सुरू करण्यात येणार आहे.

अमरावती विभागातील परतवाडा आगाराचे आगार व्यवस्थापक हे दिवसभर आपल्या कर्तव्यावर उपस्थित न राहता मद्यप्राशन करून आपल्या शासकीय निवासस्थानी अत्याव्यस्थ अवस्थेत पडले आहेत. अशी माहिती एस टी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाला आगारातील कर्मचाऱ्यांनी दूरध्वनीवरून कळवली होती.



त्यानुसार तेथे एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने छापा टाकला असता उपरोक्त तक्रारीमध्ये तथ्य आढळले. एसटीच्या सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांनी आगार व्यवस्थापक जीवन वानखेडे यांची अचलपूर उपजिल्हा रुणालयामध्ये वैद्यकीय तपासणी करून घेतली आणि त्यांच्या विरोधात परतवाडा पोलीस स्थानकामध्ये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ मधील कलम ८५(१) नुसार गुन्हा नोंद केला.सुरक्षा व दक्षता विभागाने केलेल्या तपासणीमध्ये संबंधित आगार व्यवस्थापक हे दिवसभर मद्यप्राशन करून आपल्या आगारात उपस्थित न राहता बाहेर फिरत होते. त्यामुळे आगारातील दैनंदिन वाहतूक विस्कळीत झाली. त्यांच्या कर्तव्यातील हलगर्जीपणामुळे अनेक मार्गावरील बसेस रद्द झाल्या . त्यामुळे एसटी महामंडळाचे आर्थिक नुकसान तर झालेच परंतु आपल्या शासकीय निवासस्थानी व आगारात मद्यप्राशन करून गैरवर्तन केल्याबद्दल जन माणसात एसटी महामंडळाची प्रतिमा मलिन झाली. असा निष्कर्ष काढून त्यांच्यावर रितसर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

या संदर्भात लवकरच प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली त्यांची खातेनिहाय विभागीय चौकशी करून त्यात ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर बडतर्फी ची कारवाई करण्यात येईल अशी माहिती सुरक्षा व दक्षता खात्याने दिली आहे. या प्रकरणामुळे एसटी अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या कामावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहे.

# "वंदे मातरम" म्हणा, अन्यथा देश सोडून जा!"

### कामगार मंत्र्यांचे विधान; विरोध करणाऱ्यांना खडेबोल सुनावताना:

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला** - 'वंदे मातरमब गीत गाण्यात ज्यांना लाज वाटत असेल त्यांनी खरं तर देश सोडून जायला पाहिजे. या देशाचे खायचे, इथे मोठे व्हायचे आणि वंदे मातरमब गीताला विरोध करायचा, गीत गाण्यास असमर्थता दाखवयाची, त्यांनी या देशातच राहू नये,' असे विधान राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले. 'वंदे मातरम' गीताला विरोध करणाऱ्यांना त्यांनी खडेबोल सुनावले.



'वंदे मातरम' या राष्ट्रगीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने भाजपने शुक्रवारी देशभर १५० ठिकाणी कार्यक्रम घेतला. राज्यात १५ ठिकाणी भाजपकडून 'वंदे मातरम' गायनाचा कार्यक्रम झाला. अकोल्यातील कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर ॲड. आकाश फुंडकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ॲड. फुंडकर यांनी शेलक्या भाषेत विरोधकांचा समाचार घेतला.

ते म्हणाले, 'वंदे मातरम' असे गीत आहे, ज्यामुळे देश स्वतंत्र झाला. १८७५ मध्ये हे गीत लिहिल्या गेले. आता आपण २०२५ मध्येही हे गीत गात आहोत. हे अमर झालेले शब्द आहेत. हे गीत गाण्यास ज्यांना लाज वाटत असेल किंवा कमीपणा वाटत असेल तर त्यांनी देश सोडून जायला पाहिजे. या गीताला विरोध करणाऱ्यांनी देशातच राहू नये.मौलाना अब्दुल कलाम, माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यासह मुस्लीम व इतर समाजातील सर्व स्वातंत्र्य सेनानींनी 'वंदे मातरम' गीत गायले आहे. 'वंदे मातरम' गीताचे शब्द अमर झाले, त्यामुळेच आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. याचेच फळ हे लोक चाखत आहेत. त्यामुळे 'वंदे मातरम' गीत म्हटले पाहिजे, नाही तर देश सोडला पाहिजे.'

# जिल्हानिहाय कापूस खरेदी मर्यादा केली कमी; सीसीआयच्या नवीन अटी

## सीसीआयची जिल्हानिहाय कापूस खरेदी : चुकीची आकडेवारी उठली शेतकऱ्यांच्या जिवावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८यवतमाळ-**

सीसीआयने यावर्षी जिल्हानिहाय कापूस खरेदी मर्यादा कमी केली आहे. हा निर्णय केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्य सरकारच्या कृषी विभागाकडून प्राप्त झालेल्या कापूस उत्पादकता आकडेवारीच्या आधारे घेतला आहे. विशेष म्हणजे, कृषी विभागाच्या पीक कापणी प्रयोग आणि सांख्यिकी विभागाच्या आकड्यांमध्ये घोळ आहे. केंद्र व राज्य सरकारचा कृषी विभाग, सीआयसीआर आणि कृषी विद्यापीठांनी जाहीर केलेल्या उत्पादकतेतही मोठी तफावत आहे.

कृषी विभाग विविध पिकांची उत्पादकता काढण्यासाठी दरवर्षी प्रति मंडळ १२ प्रमाणे पीक कापणी प्रयोग घेतात. सन २०२४-२५ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये एकूण १,३२० पीक कापणी प्रयोग घेण्यात आले. यात एकाच तालुक्यातील वेगवेगळ्या मंडळातील कापसाची उत्पादकता वेगवेगळी आढळून आली आहे. यवतमाळ तालुक्यातील हिवरी मंडळात रुईची उत्पादकता सर्वात कमी म्हणजे ३९७.३४ किलो



प्रतिहेक्टर तर येलाबारा मंडळात सर्वाधिक म्हणजे ४७२.५३ किलो प्रतिहेक्टर आढळून आली. जिल्ह्याची तालुकानिहाय सरासरी उत्पादकता विचारात घेता आर्णी तालुक्याची सर्वात कमी म्हणजे २८६.४७किलो प्रतिहेक्टर, तर मारेगाव तालुक्याची ४८८.३८ किलो प्रतिहेक्टर काढण्यात आली. संपूर्ण जिल्ह्याची सरासरी रुई उत्पादकता ३९०.०८ किलो प्रतिहेक्टर काढण्यात आली.

कृषी विभागाच्या सांख्यकी विभागाने सन २०२४-२५ ची यवतमाळ जिल्ह्याची रुई उत्पादकता २९१ किलो प्रतिहेक्टर असल्याचे पणन मंत्रालयामार्फत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाला कळिवले आणि त्याच चुकीच्या आकड्यांच्या आधारे सीसीआयने यवतमाळ जिल्ह्याची कापूस खरेदी मर्यादा १२ क्विंटल प्रतिएकरवरून ५.२१२ क्विंटल केली आहे. हा घोळ राज्यातील २८ कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये केला आहे.

### रुईच्या सरासरी उत्पादकता आकड्यांत घोळ

केंद्र सरकारचा कृषी विभाग - ३३८ किलो प्रति हेक्टर
राज्य सरकारचा कृषी विभाग - ३९६ किलो प्रति हेक्टर
सीआयसीआर, नागपूर - ३५३ किलो प्रति हेक्टर
व. ना. म. कृषी विद्यापीठ, परभणी - ४५० किलो प्रति हेक्टर

'कृषी विभागाने जिल्हा पीक कापणी प्रयोगाच्या संकलन वहीतील नोंदींचा अभ्यास न करता पिकांची उत्पादकता काढणे व जाहीर करणे चुकीचे आहे.'

**- मिलिंद दामले, शेतकरी संघटना, महाराष्ट्र**

# एसडीओंसह तहसीलदार, नायब तहसीलदार, मुख्याधिकारी यांना जवाबदारी

# ३६ अधिकाऱ्यांचा राहणार वॉच,नगरपरिषद निवडणुकीकरिता निर्णय अधिकारी नियुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती :** राज्य नआयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील १० नगरपरिषद व दोन नगरपंचायतींसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक व अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी याबाबत आदेश काढले आहेत. अशा ३६ अधिकाऱ्यांवर निवडणुकीची जवाबदारी देण्यात आली आहे.

जिल्ह्यात अचलपूर, अंजनगाव सुर्जी, वरुड, दर्यापूर, मोशी, शेंदूरजना घाट, चिखलदरा, चांदूर रेल्वे, चांदूरबाजार, धामणगाव रेल्वे नगरपरिषदांसह धारणी आणि नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीमध्ये निवडणुका लावण्यात आल्या आहे. याकरिता २ डिसेंबरला मतदान तर ३ ला मतमोजणी होणार आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून पारदर्शक आणि सुरळीत निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याच्या दृष्टीने उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांकडे नगरपरिषदनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. सोबतच तहसीलदार,




मुख्याधिकारी, आणि नायब तहसीलदारांना साहाय्यक व अतिरिक्त साहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांनी सर्व नियुक्त अधिकाऱ्यांना निवडणूक आचारसंहिता, निवडणूक प्रक्रिया आणि पारदर्शकता राखण्याचे निर्देश दिले असून, निवडणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यास सांगितले आहे.मोशी (सहाय्यक), नायब तहसीलदार ए. आर. हाडोळे (अतिरिक्त), शेंदूरजना घाट: तहसीलदार रामदास शेळके (निवडणुक निर्णय अधिकारी) मुख्याधिकारी वरुड (सहाय्यक), नायब तहसीलदार पंकज चव्हान (अतिरिक्त), चिखलदरा तहसीलदार जिवन मारणकर (निवडणुक निर्णय अधिकारी), मुख्याधिकारी चिखलदरा (सहाय्यक), नायब तहसीलदार अक्षय मांडवे (अतिरिक्त), चांदूर रेल्वे तहसीलदार पुजा माटोडे (निवडणुक निर्णय अधिकारी), मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे (सहाय्यक), नायब तहसीलदार देवेंद्र वासनिक (अतिरिक्त), चांदूरबाजार तहसीलदार सोनल सुर्यवंशी (निवडणुक निर्णय अधिकारी) मख्याधिकारी गिता ठाकरे (सहाव्यक), नायब तहसीलदार मनोज सोनारकर (अतिरिक्त), धामणगाव रेल्वे तहसीलदार अभय घोरपडे (निवडणुक निर्णय अधिकारी), मुख्याधिकारी पुनम कळंबे (सहाय्यक), नायब तहसीलदार वसंत पखाले (अतिरिक्त), धारणी एसडीओ सिद्धार्थ शुक्ला (निवडणुक निर्णय अधिकारी), मुख्याधिकारी शिवदास मुसळे (सहाय्यक), नायब तहसीलदार आकाश चव्हान (अतिरिक्त), नांदगाव खंडेश्वर तहसीलदार अश्विनी जाधव (निवडणुक निर्णय अधिकारी) मुख्याधिकारी निवृत्ती भालकर (सहाय्यक), नायब तहसीलदार सदानंद देशपांडे (अतिरिक्त) या अधिकाऱ्यांकडे निवडणुकीची जबाबदारी देण्यात आली आहे.

### नगरपरिषदनिहाय अधिकाऱ्यांची जबाबदारी

अचलपर एसडीओ बळवंत अरखराब (निवडणुक निर्णय अधिकारी) मुख्याधिकारी धिरज गोहाड (सहाय्यक), तहसीलदार संजय गरकर (अतिरिक्त), अंजनगाव सुर्जी: एसडीओ राजेश्वर हांडे (निवडणुक निर्णय अधिकारी) मुख्याधिकारी विजय लोहकरे (सहाय्यक), तहसीलदार पुष्पा दाभेराव, बरुड: उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हान (निवडणुक निर्णय अधिकारी) मुख्याधिकारी गजानन भोयर (सहाय्यक), नायब तहसीलदार नामदेव गडलिंग (अतिरिक्त), दर्यापूर एसडीओ दादासाहेब दराडे (निवडणुक निर्णय अधिकारी), मुख्याधिकारी विकास खंडारे (सहाय्यक), तहसीलदार रविंद्र कानडजे (अतिरिक्त), मोर्शी तहसीलदार सागर ढवळे (निवडणुक निर्णय अधिकारी) मख्याधिकारी

### राज्यातील पोलीस अंमलदारांनी मानले आ. मुनगंटीवार यांचे आभार

# दोन वर्षांपासून प्रलंबित डीजी लोनला १७६८ कोटींची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चंद्रपूर -** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. श्री. मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्यातील ५ हजार ४५९ पोलीस अंमलदारांच्या हक्काच्या घराचा प्रश्न सुटला आहे. त्यासाठी राज्यभरातील पोलिसांनी आ. श्री. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत. तसेच राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी पोलिसांच्या हक्काच्या घराचा प्रश्न संवेदनशीलतेने सोडविल्याबद्दल आ. श्री. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

शासनाकडून मिळणाऱ्या डीजी लोन (पोलीस गृहबांधणी अग्रीम) योजनेपासून राज्यातील ५ हजार ४५९ पोलीस अंमलदार दोन वर्षापासून वंचित होते. यासंदर्भातील माहिती मिळताच आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शासनाने डीजीलोन करीता १७६८.०८ कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी दिली. याबाबतचे आदेश गृहविभागाचे उपसचिवांनी काढले.



महाराष्ट्र पोलिस दलासाठी डीजी गृह कर्ज योजना अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे अंमलदार यांना घर बांधण्यासाठी थेट पोलिस गृहविभागाकडून मूळ वेतनाच्या १२५ टक्के कर्ज मिळते. ज्या अधिकारी व अंमलदारांकडे स्वतःचे निवासस्थान नाही. अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे स्वतःचे हक्काचे घर मिळावे या करीता ही योजना राबविली जाते. ऑगस्ट २०२३ पासून आजपर्यंत राज्यातील जवळपास पाच हजार ४५९ अंमलदारांनी डीजी लोन करीता अर्ज दाखल केले होते. परंतु दोन वर्षात शासनाकडून योजनेतील एकाही अंमदाराचा अर्ज मंजूर करण्यात आलेला नव्हता. डीजी लोन करीता शासनाकडे राज्यभरातून सुमारे ४ हजार ७११ आणि मुंबईतून ७४८ इतके अर्ज दाखल केले आहे. हे संपूर्ण अर्ज ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे सादर कले आहेत. यामध्ये ४ हजार ७११ अर्जाकरीता १२५५ कोटी ८७ लाख रुपयांची तर बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयातंर्गत ७४८ प्रलंबित अर्जाेरणठी २१२ कोटी २० लाख रुपयांची आवश्यकता होती.

### अमरावतीतील बलात्कार पीडितेच्या प्रकरणात

# सर्वोच्च न्यायालयाचा कठोर आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली :**बलात्कार आणि लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांतील पीडित महिलांना योग्य तो भरपाई देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व सत्र न्यायालये आणि पॉक्सो न्यायालयांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. अशा प्रकरणांमध्ये न्यायालयांनी कायद्याअंतर्गत भरपाईविषयी आदेश द्यावेत, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.



न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार व राष्ट्रीय विधिक सेवा प्राधिकरण (छअङडअ) यांना नोटीस बजावत, बलात्कार पीडितांना भरपाई न दिल्याबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. ही सुनावणी अधिवक्ता गौरव कुमार बंसल यांच्या माध्यमातून ज्योती प्रविण खंडपसोलें यांनी दाखल केलेल्या याचिकेवर झाली. या याचिकेत महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील २५ वर्षीय मानसिकदृष्ट्या दुर्बल बलात्कार पीडितेचे प्रकरण मांडण्यात आले होते.

राज्य प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे आणि अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे या पीडितेला दंड प्रक्रिया संहिता कलम ३५७-अ आणि 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत मिळणारी भरपाई नाकारण्यात आली होती, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

# महासचिवाच्या राजीनाम्याने काँग्रेसमध्ये खळबळ

## पालिका निवडणुकीपूर्वी जोरदार धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८दर्यापूर**

पालिका निवडणूक तथा जिल्हा परिषद व पंचायत समिति निवडणुकीत सामान्य कार्यकर्त्याला कोणतेही बळ न देर्णा?या काँग्रेसच्या वरिष्ठांच्या विरोधात दंड थोपटून दर्यापूरमध्ये बहूचर्चित व्यक्तिमत्व असलेल्या अजय ब्रदिया वसू यांनी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा महासचिव पदाचा राजीनामा देत पक्षाला जोरदार धक्का दिला आहे. यामुळे सर्वत्र चर्चेला उधाण आले असून काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली आहे.

राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडवत अजय बद्रिया (वसू) यांनी अमरावती जिल्हा महासचिव या पदाचा राजीनामा पक्षश्रेष्ठीकडे सादर केला आहे. त्यांनी आपल्या राजीनाम्याचे पत्र काँग्रेस जिल्हा अध्यक्षांकडे दिल्याची माहिती मिळाली आहे. अजय ब्रदिया हे दर्यापूरमधील बहूचर्चित व्यक्तिमत्व आहे. अनेक गणेश मंडळ तथा दुर्गा मंडळाचे अध्यक्ष राहिले असून कार्यकर्त्यांची मोठी फळी त्यांनी निर्माण केली आहे; यांसह आनेक गरीब गरजू लोकांना रुग्णलयीन मदत, शैक्षणिक मदत देत अनेकांच्या हृदयात स्थान बनविले आहे. वसू बिल्डर आणि डेव्हलपर्सचे ते संचालक आहेत व अनेक समाजसेवी



संस्थांशी जुळले आहेत.

त्यांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेस जिल्हा संघटनेत चर्चेचा विषय निर्माण झाला आहे. अजय बद्रिया यांनी राजीनाम्यामागील कारण वैयक्तिक असल्याचे सांगितले असून, त्यांनी पक्षावरील आपली निष्ठा कायम राहील, असेही स्पष्ट केले आहे. मात्र, या निर्णयामुळे पुढील काही दिवसांत अमरावती जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वैयक्तिक कारणासाठी मी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा महासचिव पदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या अनेक वर्षापासून मी काँग्रेस पक्षाचे निष्ठेने काम करीत आहे. पुढील काळात इतर कोणत्या पक्षात जाण्याचा अजून विचार केलेला नाही. सद्य स्थितीत मी काँग्रेस पक्षातच एक साधा कार्यकर्ता म्हणून राहणार आहे, असे ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

### विश्वविजेत्या संघाचा 'परफॉर्मर अनॅलिस्ट' अमरावतीचा

# अनिरुद्ध देशपांडे याचे सर्वस्तरातून कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

भारतीय महिला क्रीकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हीने आपल्या टीममेटसह जेव्हा विश्वचषक उंचावला तेव्हा तो क्षण फक्त एक विश्वविजयाचा नव्हता, त्या एका क्षणात अनेकांची स्वप्नपूर्ती झाली आणि अनेकांच्या पंखांना नवे बळ मिळाले. महिला क्रिकेट संघाला उत्कृष्ठ खेळाची दाद मिळत असताना पडद्यामागील रणनिती आणि नियोजन करणारे शिल्पकार यांचाही या विजयामध्ये तेवढाच मोठा वाटा आहे. समस्त अमरावतीकरांकरीता गौरवाची बाब म्हणजे, या विश्वचषक विजयामध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा एमसीएचा विद्यार्थी व क्रिकेटपटू अनिरूद्ध देशपांडे यांनी संघाचा 'परफॉर्मर अनॅलिस्ट' म्हणून विश्व विजयामध्ये महत्वपूर्ण व मोलाची भूमिका पार पाडली.



अंबिका नगर येथील रहिवाशी अनिरूद्ध देशपांडे याने लहानपणापासून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात क्रिकेटचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षक डॉ. दिनानाथ नवाथे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीकेटमध्ये प्राविण्य प्राप्त करीत अनिरुद्धने १९ वर्षाखालील अखिल भारतीय कुचबेहर चषक २००६ मध्ये विदर्भाचे प्रतिनिधित्व केले होते. याच क्रीकेट क्षेत्रात भवितव्य घडविण्याकरिता अनिरूद्धने विदर्भ रणजी संघासाठी १४ वर्षापासून व्हिडीओ विश्लेषण केले.

अनिरूद्ध यांचा व्हिडीओ अनॅलिस्ट, डाटा, रणनिती, विरोधी खेळाडूंच्या कमजोरी, खेळण्यातील बारकावे आदी अनुभव लक्षात घेत मागील वर्षापासून भारतीय महिला क्रीकेट संघाच्या 'परफॉर्मर अनॅलिस्ट' म्हणून तो कार्य करीत आहे. महिला क्रिकेट विश्वचषक मध्ये भारतीय संघाला योग्य माहिती देत विजयाचे शिल्पकार घडविणारा अनिरूद्ध देशपांडे यांच्या यशस्वी कामगीरीचे क्रीकेट जगातामध्ये प्रशंसा होत आहे. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष अ?ड. प्रशांत देशपांडे, सचिव माधुरी चेंडके, हव्याप्र मंडळाचे क्रिकेट प्रशिक्षक डॉ. दिनानाथ नवाथे यांच्यासह जिल्हा हौशी क्रीकेट संघटना पदाधिकारी व समस्त अमरावतीकरांनी त्याचे अभिनंदन करीत कौतुक केले आहे.

# वरखेड पंचायत समिती अनुसूचित जाती महिला उमेदवारासाठी शोधमोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ तिवसा**

तालुक्यातील जिल्हापरिषद व पंचायतसमिती निवडणुका या २० वर्षानंतर प्रथमच एकत्र होत असल्यामुळे राजकीय समीकरणासोबतच आर्थिक बाजू साभाळण्याकरिता उमेदवारांना अधिक सोईचे झाले असल्याने आता जिल्हापरिषद उमेदवार व दोन पंचायत समितीमधील उमेदवार कोण असावा, याचे आराखडे बांधल्या जात आहे.राजकीय पक्षांनी यासाठी शोधमोहीम राबवली असल्याचे समोर आले आहे, तर काँग्रेस आणि भाजपने यासाठी पक्षाकडे उमेदवारी मागण्यांसंदर्भात पक्षाकडे फॉर्म भरून घेतले आहे; मात्र यामध्ये वरखेड पंचायतसमितीमधील अनुसूचित जाती महिला सक्षम तसेच मोठ्या


(संग्रहीत फोटो)

गावातील उमेदवार मिळावा म्हणून आजही प्रयत्नशील असल्याचे समोर आले आहे.

वरखेड पंचायतसमिती सर्कल हे २५ वर्षातील कालावधीत तिसऱ्यांदा अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव निघाले आहे. या दोन्ही टर्ममध्ये भारतीय जनता पक्षाच्या सौ. अवसरे व अर्चना विरुळकर या निवडून आल्या होत्या. त्यानंतरत्यांनी पक्षाशी संपर्क ठेवला नसल्यामुळे पुन्हा नवीन चेहऱ्याच्या शोधात पक्ष - असून हिंदू कार्ड समोर करून - उमेदवार देणार असल्याचे बोलल्या जात आहे.

वरखेड पंचायतसमिती सदस्य म्हणून काँग्रेसच्या पद्मा खैरकार, भाजप्या सौ. अवसरे, रामकृष्ण गावनार, काँग्रेसचे चंद्रशेखर ठाकूर, भाजपच्या अर्चना विरुळकर, तर २०१९ मध्ये काँग्रेसच्या रोशनी पुनसे यांनी वरखेड सर्कलचे प्रतिनिधीत्व केले आहे.

एकंदरीत वरखेड पंचायतसमिती सर्कलवर भारतीय जनता पक्ष व काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले आहे.विशेषतः हे सर्कल धनगर समाज बहुल मतदारसंघ म्हणून पहिल्या जाते, तर येथे काँग्रेस आणि भाजपचे वर्चस्व राहिले आहे, तर याच मतदार सर्कलमध्ये भारिप बहुजन महासंघाचे उमेदवार कविता जानराव मनोहर व प्रदीप मधुकर बोके हे दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले उमेदवार होते, तर सौ. कविता मनोहर यांचा राखीव मतदारसंघातून १३० मतांनी पराभव झाला होता.

आज मात्र परिस्थिती बदलली असून तालुक्यातून आजचे वंचित बहुजन आघाडीचा ग्राफ पूर्णतः पूर्वीपेक्षा मताच्या आकड्यात घसरला आहे. तळेगाव ठाकूर जि. प. मतदारसंघात येणाऱ्या वरखेड व तळेगाव ठाकूर पं. स. मध्ये २०१९ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेसचे उमेदवार निवडून येऊन पंचायत समितीवर काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता राखली आहे.

आजच्या परिस्थितीत काँग्रेस भाजप शिवसेना, राष्ट्रवादी, प्रहार, युवा स्वाभिमान व वंचित आघाडी इत्यादी पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागलेत. काहीचे उमेदवार शोधमोहिमेत असून निवडणुकीच्या तारखेनंतर राजकीय उलाढाली कशाप्रकारे घडतात. उमेदवार निवड या सर्व बाबीवर पुढील वरखेड सर्कलमधील पंचायत समितीची राजकीय दिशा निश्चित होणार असल्याचे बोलल्या जात आहे.

# वाघाने माणसाला उचलून नेल्याचा एआय व्हिडीओ व्हायरल

## बनावट वन्यजीव व्हिडिओंमुळे वनखात्यासमोर नवे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नागपूर**

एका वाघाने घराच्या अंगणात येऊन एका माणसाला उचलून नेल्याचा एक नवीन एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) निर्मित व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. यापूर्वी ३० ऑक्टोबर रोजी एका व्यक्तीने वाघाला दारू पाजण्याचा प्रयत्न केल्याचा एआय व्हिडिओ व्हायरल झाला होता. अशा बनावट व्हिडिओंमुळे वनखात्यासमोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.



यापूर्वी व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एक व्यक्ती दारूच्या नशेत वाघाच्या डोक्यावर हात फिरवताना आणि त्याला दारू पाजण्याचा प्रयत्न करताना दिसत होता. हा वाघ एआय सॉफ्टवेअरच्या मदतीने तयार करण्यात आला होता. व्हिडिओमध्ये वाघ रंगीत दिसत होता, तर बाकीचे सर्व दृश्य ब्लॅक अँड व्हाईट होते, ज्यामुळे तो एआय निर्मित असल्याचे स्पष्ट झाले होते. नागपूर ग्रामीण पोलिसांनी या व्हिडिओच्या निर्मात्याला शोधून नोटीस बजावली होती.

सध्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, फाटकातून आत आलेला वाघ अंगणात बसलेल्या एका माणसावर झडप घालून त्याला उचलून नेताना दिसत आहे. वनबल प्रमुख श्रीनिवास राव यांनी हा व्हिडिओ एआय निर्मित असल्याचे स्पष्ट केले आहे. अशा प्रकरणांमध्ये वनखाते सायबर पोलिसांकडे तक्रार करते आणि सायबर पोलिस पुढील कारवाई करतात. नागरिकांनी खातरजमा केल्याशिवाय असे व्हिडिओ व्हायरल करू नयेत, असे आवाहन श्रीनिवास राव यांनी केले आहे.

सातपुडा फाऊंडेशनचे उपसंचालक मंदार पिंगळे यांनी या बनावट व्हिडिओंमधील सर्वात मोठा धोका त्यांच्या उच्च दर्जाच्या निर्मितीमध्ये असल्याचे म्हटले आहे. हे व्हिडिओ केवळ साधे फेरफार नसून, क्लिक्स आणि नफ्यासाठी मानवी भावनांना तीव्रपणे भडकावण्यासाठी हेतुपुरस्सर तयार केले जातात, असे त्यांनी सांगितले.

सामान्य प्रेक्षकांना वास्तविक आणि अत्यंत प्रगत डीपफेक व्हिडिओमधील फरक ओळखणे खूप कठीण झाले आहे. एआय मॉडेल्स इतकी प्रगत झाली आहेत की बनावटपणाचे दृश्य संकेत खरे वाटावे इतके हुबेहूब तयार केले जातात. सत्य आणि आभासीपणातील सीमारेषा पुसल्या गेल्यामुळे चुकीची माहिती अभूतपूर्व वेगाने पसरत आहे. यामुळे जनता केवळ भयभीत होत नाही, तर त्यांना प्राण्यांच्या वास्तविक वर्तनाबद्दल आणि संघर्ष कमी करण्याच्या उपायांबद्दल गंभीरपणे चुकीची माहिती मिळते.

या आव्हानाचा सामना करण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील एकत्रित आणि तातडीच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे. दूरसंचार आणि प्रसारण मंत्रालय आणि संबंधित वन विभागाने एकत्रितपणे व्यापक जनजागृती करण्यासोबतच ठोस मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे गरजेचे आहे. वन विभागाने व्हायरल वन्यजीव व्हिडिओंना त्वरित सत्यापित आणि खंडित करण्यासाठी एक जलद, विश्वासार्ह आणि सार्वजनिक-केंद्रित प्रोटोकॉल स्थापित करणे आवश्यक आहे, असे पिंगळे यांनी सुचवले आहे.

# अधिकारी अवैध वाळू जप्तीचा पंचनामा करत असताना चालक ट्रक घेऊन पसार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

परतवाडा येथील चांदूर बाजार नाकापरिसरात महसूल विभागाच्या पथकाने गुरुवारी अवैध वाळू वाहतूक करणारा एक ट्रक पकडला. त्या वाहन चालकाकडे वाळूचा कोणताही परवाना नव्हता. त्यामुळे ते वाळूसह ट्रकजप्तीचा पंचनामा करत होते. त्याचवेळी चालकाने वाळूने भरलेल्या ट्रकसह पलायन केले. या प्रकरणी मंडळ अधिकारी अमोल बोकडे (४८, रा. कांडली, परतवाडा) यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी ट्रकचालकाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.संबंधित ट्रकमध्ये अंदाजे ६० हजार रुपये किमतीची १० ब्रास वाळू होती. मंडळ अधिकारी बोकडे व त्यांचे पथक गुरुवारी अचलपूर ते चांदूर बाजार नाका या मार्गाने गस्त घालत होते. त्यावेळी त्यांनी वाळूने भरलेला हा ट्रक थांबवला होता. त्यांनी चालकाकडे वाळू वाहतुकीचा परवाना मागितला असता, चालकाने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर पंचनामा सुरू असताना चालकाने अचानक ट्रक सुरू करून तेथून पळ काढला. या घटनेनंतर परतवाडा पोलिसांनी तत्काळ कारवाई करत गुरुवारी दुपारी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# इतिहास विसरणारे भविष्य घडवू शकत नाहीत : व्याख्याते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८दर्यापूर**

भारताने प्राचीन काळापासून जगाला मार्गदर्शन केले आहे. आजही अनेक देश भारताच्या परंपरेचा अभ्यास करत त्यांच्या देशात बदल घडवत आहेत. सनातन धर्मच सर्वात जुना धर्म असून संपूर्ण जगात शांतता नांदवण्याची क्षमता केवळ भारतीय संस्कृतीत आहे. धर्म म्हणजे केवळ पूजा पाठ नव्हे तर ते जगण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. कारण, इतिहास विसरणारे भविष्य घडवू शकत नाहीत, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध ज्येष्ठ व्याख्याते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी केले. दर्यापुरात सकल हिंदू समाज मंचाच्या वतीने गुरुवारी सायंकाळी बस स्टँडसमोरील स्वातंत्र्य सेनानी वा. का. धर्माधिकारी नगर परिषद शाळेच्या प्रांगणात जाहीर व्याख्यानाचे आयोजन केले होते. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ बोलत उत होते. व्याख्यानप्रसंगी मंचावर प्रदीप मलिये व सागर महाराज परिहार यांची उपस्थिती होती. आपल्या देशाने गेल्या काही वर्षात अनेक बदल अनुभवले आहेत. ते बदल राज्यकर्त्यांनी केले नसून जनतेच्या माध्यमातून झाले आहेत. जगातील सगळे धर्म हे एक सारखे असू शकत नाहीत. प्रत्येक धर्माचा वेगळा विचार आहे. मात्र, आपली संस्कृती व भारतीय परंपरा संपूर्ण जगात वेगळा ठसा उमटवत भारताला श्रेष्ठ बनवत आहे. भारतीय संविधानाच्या बाबतीत काही लोकं फेक नरेटिव्ह तयार करत संभ्रम निर्माण करत आहेत. हा डाव उधळून लावण्याची जबाबदारी भारतीयांची आहे.

# आ.प्रकाश भारसाकळे न.प. अंजनगाव दर्यापूरचे निवडणूक प्रभारी नियुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अंजनगाव सुर्जी**

६ नोव्हेंबर रोजी भारतीय जनता पार्टी कार्यालय अकोला येथे उपेंद्र कोठेकर संघटन मंत्री विदर्भ प्रांत व प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर यांच्या प्रमुख व उपस्थितीत दर्यापूर अंजनगाव सुर्जी येथील कार्यकर्त्यांची नगरपरिषद निवडणूकसंदर्भात चर्चा झाली. यावेळी अकोट मतदारसंघाचे आ. प्रकाश पाटील भारसाकळे यांना अंजनगाव दर्यापूर मतदारसंघासाठी निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले. या



नियुक्तीची घोषणा उपेंद्र कोठेकर संघटन मंत्री विदर्भ प्रांत यांनी केली व त्यांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी जिल्हा जबाबदारी दिली. यावेळी म्हणून महामंत्री गोपाल चंदन व भरत शुक्ला यांना सहकारी पाटील आ. प्रकाश भारसाकळे यांनी सर्व कार्यकर्त्यांना एकजुटीने पक्षाचे काम करून आपला विजय खेचून आणण्याचे आवाहन केले.याप्रसंगी दर्यापूर अंजनगाव मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आ. प्रकाश पाटील भारसाकळे यांना शुभेच्छा दिल्या.

# निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय; 'स्टार' प्रचारकांची मर्यादा दुप्पट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने पक्षांच्या मागणीचा विचार करून प्रमुख किंवा स्टार प्रचारकांच्या संख्येत वाढ केली आहे. यापूर्वी प्रत्येक पक्षाला केवळ २० प्रचारकांची नावे देण्याची परवानगी होती, मात्र आता ही मर्यादा वाढवून ४० प्रचारकांपर्यंत करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पक्षांना त्यांच्या वरिष्ठ नेत्यांना, प्रभावी वक्त्यांना आणि जनसंपर्कात कौशल्य असलेल्या कार्यकर्त्यांना प्रचारासाठी उतरवणे अधिक सोयीचे होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या या निर्णयामागे पक्षांची मागणी होती. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी सहभागी होऊन ही मागणी केली होती. त्यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य निवडणुका राज्यभर होत असल्याने अनेक जिल्ह्यांत, तालुक्यांत आणि शहरांमध्ये वेगवेगळ्या प्रचारमोहीमा राबवाव्या लागतात. अशा परिस्थितीत केवळ २० प्रचारकांची मर्यादा अपुरी ठरत होती. पक्षांनी या मर्यादेमुळे प्रचारात अडथळा येत असल्याचेही निदर्शनास आणले होते. अखेर या




मागणीचा सकारात्मक विचार करून राज्य निवडणूक आयोगाने संख्यावाढीला मंजुरी दिली आहे.

ही वाढ महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ मधील परिच्छेद २६ नुसार करण्यात आली आहे. आयोगाने सांगितले आहे की, निवडणुकांच्या वेळी पक्षांना प्रचारासाठी अधिक स्वातंत्र्य मिळावे आणि विविध क्षेत्रांमध्ये त्यांच्या नेत्यांचा प्रभावी सहभाग राहावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. या आदेशामुळे आता पक्षांना स्थानिक स्तरावर प्रचार मोहीम अधिक व्यवस्थित आणि जोरदारपणे राबवता येईल. विशेषतः मोठ्या नगरपालिकांमध्ये आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये याचा फायदा अधिक होणार आहे.


# आ. रवी राणा यांच्या प्रयत्नांना यश; कोंडेश्वर येथे 'बोधीभूमी' संकुलासाठी १० एकर जागा व ५ कोटींची मंजुरी

## जिल्ह्याचे लोकप्रिय पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते सोमवारी पायाभरणीचा समारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

आमदार रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे कोंडेश्वर येथे उभारण्यात येणाऱ्या बोधीभूमी आध्यात्मिक-सांस्कृतिक संकुलासाठी शासनाकडून १० एकर जागा आणि ५ कोटी रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली आहे. या संकुलाच्या उभारणीसाठी सुमारे १०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून, तो लवकरच मुख्यमंत्री यांच्या हस्ते मंजूर होणार आहे.

या प्रकल्पाच्या पायाभरणीचा समारंभ सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११



वाजता होणार असून, या कार्यक्रमाचे भूमिपूजन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते होणार आहे. सृजनशील शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक सेवामंडळ, अमरावतीतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी आमदार रवी राणा, माजी लेडी गव्हर्नर कमलताई गवई, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, कीर्ती गवई (अर्जुन), संस्थेच्या अध्यक्षा कलावती भटकर, कोषाध्यक्ष अन्नपूर्णा दामले, सचिव अश्विनी भटकर व वैदर्भी मेश्राम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कोंडेश्वरच्या निसर्गरम्य परिसरात उभे राहणारे हे बोधीभूमी संकुल बडनेरा मतदारसंघाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक विकासाला नवी दिशा देणार आहे. संकुलात तथागत गौतम बुद्धांची ५१ फूट उंच मूर्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, संविधान भवन, विपश्यना केंद्र, ५०० विद्यार्थ्यांसाठी निवासी अभ्यासिका, आर्ट गॅलरी आणि रिसर्च सेंटर यांचा समावेश असणार आहे.बोधीभूमी हे समता, शांतता आणि करुणेचा संदेश देणारे प्रेरणास्थळ ठरेल, तसेच अमरावती जिल्ह्याच्या धार्मिक, शैक्षणिक आणि पर्यटन क्षेत्राला नवचैतन्य देईल, असा विश्वास आमदार रवी राणा यांनी व्यक्त केला.

# एचआयव्ही जनजागृतीसाठी सर्व स्तरावर प्रयत्न आवश्यक - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ अमरावती**

एचआयव्ही प्रतिबंध आणि जनजागृतीसाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक असून, या संदर्भातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही सर्व विभागांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मा. आशिष येरेकर यांनी केले. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती तसेच एचआयव्ही संबंधित इतर बैठकींचे आयोजन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.



या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संजिता मोहपात्रा, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा नियोजन अधिकारी सीमा भाकरे, क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड, शहरी क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, सामाजिक संस्था प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे यांनी राष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या इंटेन्सिफाइड आयईसी मोहिमेचा आढावा सादर केला. त्यानंतर बोलताना जिल्हाधिकारी येरेकर यांनी एचआयव्ही बाधित व्यक्ती, तृतीयपंथी, वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला, स्थलांतरित कामगार आणि ट्रकचालक यांच्यावरील कलंक दूर करण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने वागावे, त्यांच्या ओळखपत्र व सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये येणाऱ्या अडचणी त्वरित दूर कराव्यात, असे निर्देश दिले.

# सागवानाची झाडे हॅमर करून देत होता पास

# परतवाड्याच्या वनपालावर डिमांड ट्रॅप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

सागवानाची झाडे हॅमर करून रहदारी पास देण्यासाठी सहा हजार रुपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी परतवाडा येथील एका वनपालाला एसीबीने ट्रॅप केले. अभय भिमसेन चंदेल (५०, रा. कांडली, परतवाडा) असे लाचखोर वनपालाचे नाव आहे. चंदेल हा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक कार्यालय, परतवाडा येथे वनपाल म्हणून कार्यरत आहे. त्याच्याविरूद्ध एसीबीच्या पोलिस निरीक्षक निलिमा सातव यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी ७ नोव्हेंबर रोजी रात्री १०.५२ च्या सुमारास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९६८ च्या कलम ७, ७ (१) अन्वये गुन्हा दाखल केला.



तक्रारदाराची अचलपूर तालुक्यातील मौजे म्हसोना येथे आठ एक्कर शेती आहे. त्यांनी शेतात २० वर्षांआधी अंदाजे सागवानाची १२५ झाडे लावली होती. त्यापैकी ५० झाडे कापण्यासाठी त्यांनी २४ फेब्रुवारी रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथे त्यांच्या मुलाच्या नावाने अर्ज केला होता. त्यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी यांनी जाहिरनामा करून कायदेशिर कार्यवाही पूर्ण केली होती. याच प्रकरणात प्रादेशिक कार्यालय परतवाडा येथील वनपाल अभय भिमसेन चंदेल याने तकारदार यांना हॅमर करून रहदारी पास देण्यासाठी ११ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. ३१ जुलै रोजीच्या तक्रारीवर एसीबीच्या अमरावतीच्या पथकाने १ ऑगस्ट रोजी त्या डिमांडची पडताळणी केली. अभय भिमसेन चंदेल याने तडजोडीअंती सहा हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्नदेखील झाले. मात्र पडताळणी कारवाईदरम्यान चंदेल याला तक्रारदारावर संशय आल्याने त्याने लाच रक्कम घेण्याबाबत टाळाटाळ करून ती लाच रक्कम स्विकारली नाही.

अमरावती परिक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक सुनिल किनगे, सापळा अधिकारी पोलिस निरीक्षक निलीमा सातव, पोलीस अंमलदार उपेंद्र थोरात, वैभव जायले, आशिष जांभोळे व अंमलदार गोवर्धन नाईक यांनी ही कारवाई पार पाडली.

# एमएसपी केवळ नावालाच ! सीसीआयची ९५% कापूस खरेदी कमी दरात

## ६३ ते ६८ टक्के कापूस व्यापाऱ्यांकडे : सीसीआयचा बाजारातील वाटा ३४ टक्के

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

सीसीआयने केंद्र सरकारने जाहीर केलेल्या एमएसपी दरात शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करणे अपेक्षित आहे. मात्र, मागील वर्षी सीसीआयने खरेदी केलेल्या एकूण कापसापैकी ९५ टक्के कापूस किमान म्हणजेच एमएसपीपेक्षा कमी दरात खरेदी केला. देशातील एकूण कापूस खरेदीत सीसीआयचा वाटा ३२ ते ३७टक्के असून, उर्वरित ६३ ते ६८ टक्के कापूस व्यापाऱ्यांनी खरेदी केला.

केंद्र सरकारच्या सीएसीपीने सन २०२४-२५ च्या हंगामासाठी लांब धाग्याच्या कापसाची एमएसपी ७,५२१ रुपये तर मध्यम धाग्याच्या कापसाची ७,१२१ रुपये प्रतिक्विंटल जाहीर केली होती. बहुतांश राज्यांमधील कापूस लांब धाग्याच्या श्रेणीत मोडतो.

या हंगामात यवतमाळ जिल्ह्यात एकूण ८ लाख ७३ हजार ५०७ गाठी पावसाचे उत्पादन झाले होते. सीसीआयने या जिल्ह्यात १५ खरेदी




**कापूस उत्पादन व सीसीआयची खरेदी**

| राज्य | उत्पादन | खरेदी (लाख गाठी) |
|---|---|---|
| तेलंगणा | ४९,०० | ४०,०० |
| महाराष्ट्र | ११०,०० | ३०,०० |
| गुजरात | ७७.०० | १४.०० |
| कर्नाटक | २६,०० | ५,०० |
| मध्य प्रदेश | १८,५० | ४,०० |
| आंध प्रदेश | १३.५०० | ४.०० |
| ओडिशा | ३.८५ | २,०० |
| तामिळनाडू | ५,०० | ०० |
| पंजाब, | २८.०० | १.५० |
| हरयाणा, | २८.०० | १.५० |
| राजस्थान | २८.०० | १.५० |

केंद्रावर एकूण १५ लाख ६२ हजार ७७६ क्विंटल म्हणजेच ३ लाख २१ हजार ७४८ गाठी कापूस खरेदी केला. हा संपूर्ण कापूस त्यांनी ७,०२० ते ७,२२० रुपये दराने खरेदी केला आहे. हा दर सीएसीपीने जाहीर केलेल्या एमएसपीपेक्षा १९९ ते ५०१ रुपये कमी आहे.

याच हंगामात देशात ३१२.४० लाख तर महाराष्ट्रात २१ लाख गाठी कापसाचे उत्पादन झाल्याचा दावा कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने केला आहे. याच काळात देशांतर्गत बाजारात ३३२.२५ लाख आणि महाराष्ट्रात ११० लाख गाठी कापूस विक्रीस आला होता. यातील सीसीआयने देशात १००.१६ लाख आणि महाराष्ट्रात २९.४१ लाख गाठी कापूस एमएसपीपेक्षा कमी दराने खरेदी केला आहे.

**नोंदणी व खरेदी पद्धती सदोष**

सीसीआयला कापूस विकताना शेतकऱ्यांचे नाव सातबारावर नमूद असणे व आधी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणी करतेवेळी आणि कापूस केंद्रावर विकायला नेल्यावर त्या शेतकऱ्याचे फोटो काढले जायचे. त्या फोटोंची पडताळणी केली जाते. नोंदणी केल्यावर शेतकऱ्याला कापसासोबत खरेदी केंद्रावर जाणे शक्य झाले नाही व घरातील व्यक्ती गेली तर कापूस विकताना अडचणी येतात.

**खरेदी केंद्रांची कमतरता**

सन २०२४-२५ च्या हंगामात सीसीआयने देशात ५०८ व महाराष्ट्रात १२४ कापूस खरेदी केंद्र सुरू केले होते. यवतमाळ जिल्ह्यातील झरी जामणी व उमरखेड तालुक्यात एकही खरेदी केंद्र दिले नव्हते. बहुतांश केंद्र तालुक्याच्च्या ठिकाणी दिले होते तर काही तालुके वगळण्यात आले होते. अधिक अंतरामुळे शेतकऱ्यांना त्या केंद्रांवर कापूस नेणे वाहतुकीच्या दृष्टीने परवडणारे नव्हते. हीच स्थिती संपूर्ण देशभर होती.

# तस्करांचा नवीन फंडा, एकाच पासवर गौण खनिजांची दिवसभर वाहतूक?

## धक्कादायक प्रकार: मध्य प्रदेशातून परतवाड्यात येतात ओव्हरलोड डंपर, धारणीत कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८धारणी**

मध्य प्रदेशातून रेती, मुरूमसह इतर गौण खनिज आणताना महाराष्ट्रात लागणारी झिरो रॉयल्टी पास नाममात्र काढून, त्यावर केवळ आठ ते दहा तासांचा वेळ दाखवून दिवसभर फेऱ्या मारत शासनाला लाखोंचा चुना लावण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या गैरप्रकाराची तक्रार झाल्यानंतर धारणी तहसीलदारांनी तात्काळ पथक स्थापन करून चौकशी सुरू केली असून, त्यामुळे गौण खनिज तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे. परतवाड्यात मात्र बिनबोभाट वाहतूक सुरू आहे.



मध्य प्रदेशातून राज्यात येणाऱ्या क्रश स्टोन व मुरुम वाहतुकीत मोठ्या प्रमाणावर बनावट व चुकीच्या माहितीवर आधारित रॉयल्टी परवान्यांचा वापर होत आहे. त्यातून महसूल बुडविला जात आहे. मोहीम राबवून रॉयल्टी परवाने तपासावेत. मध्य प्रदेश खनिज विभागाशी संपर्क साधून पडताळणी करावी. चेकपोस्ट, टोल नाके, वजनकाटे आदी ठिकाणी तपासणी करण्याची मागणी एस. आर. पटेल यांनी तक्रारीत केली आहे.

परराज्यातून आलेला वाळूचा साठा व निर्गतीबाबत कार्यपद्धती महाराष्ट्र शासनाने दि. ५ फेब्रुवारी २०२१ रोजी जाहीर केली आहे. परराज्यातून जे गौण खनिज येतात, त्यामधील रॉयल्टीची १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठानाला जमा करणे अपेक्षित आहे. त्यानंतर शून्य रॉयल्टी प्राप्त करून त्यावर वाहतूक करणे अपेक्षित आहे. असे न करता एकाच रॉयल्टीवर दिवसभर बिनबोभाट वाहतूक केली जाते.

**१६ किलोमीटरसाठी तब्बल आठ तास ?**

मध्य प्रदेशच्या देडतलाई ते धारणीचे अंतर केवळ १६ किलोमीटर आहे. त्यासाठी लागणारा वेळ आठ तास असे रॉयल्टीवर टाकले जातो आणि त्यावरच दिवसभर गौण खनिजाची वाहतूक केली जाते. परतवाड्यातसुद्धा बहिरमपुढे मध्य प्रदेशचा भाग आहे. तेथूनसुद्धा हाच प्रकार बिनबोभाट चालतो.

धारणी येथे या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी पथक गठित करून तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी कारवाईला सुरुवात केली. हाच प्रकार परतवाड्यात असला तरी येथे पथक नाममात्र ठरले आहे. परतवाडा शहरात मोर्शी, चांदूर बाजारमार्गे मोठ्या प्रमाणात पहाटे मध्य प्रदेशातून ओव्हरलोड रेतीचे डंपर येण्याचा प्रकार नवीन नाही. यावर मात्र पूर्णता दुर्लक्ष केले जात आहे.

# अमरावती जिल्ह्यात भाजपाची निवडणूक तयारी तेजीत

## इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील दहा नगरपरिषद व दोन नगरपंचायतींच्या निवडणुका जवळ आल्याने भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे. याच अनुषंगाने आज अमरावती शहरातील राजापेठ येथील भाजप कार्यालयात इच्छुक नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

या मुलाखतींना जिल्हा निवडणूक प्रभारी आणि खासदार अनिल बोंडे, जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, तसेच आमदार उमेश येवलकर उपस्थित होते.



जिल्ह्यातील विविध नगरपरिषद आणि नगरपंचायतींतून मोठ्या प्रमाणात इच्छुकांनी उपस्थित राहून आपली उमेदवारी सादर केली.

प्रत्येक प्रभाग आणि शहरात निवडणूक कशी लढवायची, जनतेशी संपर्क कसा वाढवायचा, याबाबत इच्छुकांनी आपल्या रणनीतीसह पक्षसमोर आपली बाजू मांडली. सर्वांच्या मुलाखती पूर्ण झाल्यानंतर पुढील तीन दिवसांत अधिकृत उमेदवारांची घोषणा करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

भाजपच्या या बैठकीमुळे जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीचे वातावरण अधिकच तापले आहे.

# ग्रामपंचायत स्तरावर मतदार याद्या लागत नाहीत - भाजप हमखास चोरीच्या मूडमध्ये : यशोमती ठाकूर यांचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी प्रशासन आणि भाजपवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. ग्रामपंचायत स्तरावर मतदार याद्या लावल्या जात नसून, केवळ पंचायत समिती स्तरावरच त्या प्रसिद्ध केल्या जात असल्याचा त्यांनी गंभीर आरोप केला.

यशोमती ठाकूर म्हणाल्या की, मतदार याद्या जेव्हा प्रसिद्ध होतात, तेव्हा त्या थेट ग्रामपंचायतींमध्ये लावल्या जाणे आवश्यक आहे. मात्र सध्या त्या लावल्या जात नाहीत, यामुळे पारदर्शकतेचा अभाव निर्माण होतो.

त्यांनी निवडणूक आयोगावरही रोष व्यक्त करत सांगितले की, आयोगाच्या वेबसाईटवर एरर येत असून, मतदारांना बूथ लेवलवर फोटोग्राफसहित याद्या पाहता येत नाहीत. ही सरळसरळ बदमाशी आहे. आम्हाला येडं गाभळं समजू नका. भाजप हमखास चोरी करण्याच्या मूडमध्ये आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर घणाघात केला.या विधानांमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# अमरावती जिल्ह्यात निकृष्ट दर्जाच्या बेबी केअर किटचे वाटप

## संतप्त नागरिकांनी केली चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

अमरावती जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गर्भवती महिलांना देण्यात येणाऱ्या बेबी केअर किटमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरवले गेल्याची तक्रार समोर आली आहे. या किटमध्ये असलेले कपडे, साबण, तेल, तसेच इतर साहित्य निकृष्ट दर्जाचे व वापरण्यास अयोग्य



असल्याने लाभार्थी महिला व स्थानिक नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.या प्रकरणी संबंधित पुरवठादार व विभागीय अधिकाऱ्यांवर चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाकडून या तक्रारींची दखल घेऊन वस्तुस्थिती तपासण्यात येणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

# आरोग्य सेवक पदासाठी तब्बल १५ लाख; रॅकेटचा छडा; बनावट नियुक्तीपत्र, नकली शिक्के

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८भंडारा**

आरोग्य विभागातील आरोग्य सेवक या रिक्त पदांवर नोकरी लावून देण्याच्या नावावर तरुणांची लाखो रुपयांनी फसवणूक करणाऱ्या रॅकेट अमरावती पोलिसांनी भंडाऱ्यात उघडकीस आणताच खळबळ उडाली आहे.

भंडाऱ्यात आरोग्य सेवक पदासाठी प्रति उमेदवार १५ लाख रुपये घेऊन बनावट नियुक्तीपत्र देणाऱ्या रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. भंडारा जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागात बनावट भरती रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

जिल्हा परिषदच्या आरोग्य विभागात आरोग्य सेवक या पदावर नियुक्ती करण्याकरिता प्रति उमेदवार १५ लाख रुपये घेतल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. धक्कादायक म्हणजे तरुणांना बनावट नियुक्तीपत्र देण्यात आले. या प्रकरणात अमरावती पोलिसांनी भंडाऱ्यातून दोघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये भंडारा येथील एक तर, पुणे येथील एकाचा अशा दोघांचा समावेश आहे. त्यांच्याकडून आरोग्य सेवक पदाचे बनावट नियुक्तीपत्र आणि त्यासाठी लागणाऱ्या अधिकाऱ्याच्या पदाचे बनावट शिक्केही पोलीस पथकानं ताब्यात घेतल्यानं मोठी खळबळ उडाली आहे.




विजय यावलकर असे भंडाऱ्यातून अटक केलेल्या व्यक्तीचं नाव असून पुण्याच्या व्यक्तीचं नाव कळू शकलेले नाही. या रॅकेटमध्ये आणखी काही जणांचा समावेश असून त्यांनाही लवकर ताब्यात घेण्यात येईल, असं पोलिसांनी सांगितले.

प्राप्त माहितीनुसार, भंडारा जिल्हा परिषदच्या आरोग्य विभागात आरोग्य सेवक या पदावर नियुक्ती करण्याकरिता विजय यावलकर आणि त्यांच्यासह असलेल्या रॅकेटमधील अन्य यांनी प्रति उमेदवार १५लाख रुपये घेतले. अमरावतीच्या दर्यापूर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या एका गावातील तरुणांकडून ही रक्कम घेतल्यानंतर त्याला आरोग्य विभागात नियुक्त करण्यात आल्याचे बनावट जॉइनिंग लेटर देण्यात आले. त्यानंतर जेव्हा तरुण भंडाऱ्यात नोकरीवर रुजू होण्यास आला तेव्हा त्याची फसवणूक झाल्याचं लक्षात आलं. यामुळं त्यांनी अमरावतीच्या दर्यापूर पोलीस ठाण्यात या रॅकेट विरोधात तक्रार दाखल केली होती. या अनुषंगानं दर्यापूर पोलिसांचं एक पथक या आरोपींच्या मागावर होतं. सापळा रचून या पथकानं विजय यावलकर यांच्याशी संपर्क साधून त्याला शिताफिनं पुण्याच्या अन्य एका आरोपीसह भंडाऱ्यातून अटक केली.

# शिक्षिका माया सुरेश बागडे यांचा सेवानिवृत्ती सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नांदगाव पेठ**

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव पेठ येथील क.शि.स. पदावर मागील बारा वर्षे प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्यरत असलेल्या माया सुरेश बागडे या ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या सेवेला व योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या कुटुंबीयांनी सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य देवेंद्र ठाकरे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य सुनील राऊत, ज्येष्ठ शिक्षक चापले, माजी मुख्याध्यापिका उमेकर मॅडम, धांडे सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका या प्रसंगी उपस्थित होते.कार्यक्रमात माया बागडे यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पवार सर, बनसोडे सर, सुरवाडे सर, देशमुख सर, घारड सर, आशिया मॅडम आणि प्राध्यापक देवेंद्र सोनटक्के यांनी बागडे यांच्या सेवाभावी वृत्तीचे आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या आत्मीयतेचे कौतुक करत त्यांच्या कार्याचा गौरव केला.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत